
कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क


कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ
स्थापना १९९१



''मेरी झाँसी नहीं दूँगी''

• पुणे • वर्ष १५ वे • अंक ३ रा • ऑक्टोबर-डिसेंबर २०१९ • किंमत रु. २०/- • पृष्ठसंख्या ४० • वार्षिक वर्गणी रु. १००/-

संपर्कात राहू या ! संपर्क वाढवू या !!






www.2factor.in
Promote Your Business
Acquire New Customers
Deepen Customer Relationship
BULK SMS
marketing
12% of facebook posts are read
29% of tweets are read
31% of emails are opened
98% of text messages are read
CHECKED 150 TIMES A DAY
The average person looks at their phone 150 times a day
MOBILE ADS
75% of people prefer receiving marketing messages via SMS
15% prefer receiving email ads
10% prefer in-app or push ads
Solv Technologies
2Factor, Solv Technologies,
19-02, B-Wing, Peninsula Business Park,
Lower Parel, Mumbai 400013
www.2factor.in
sales@2factor.in
022 48933933

| शहर : | सभासदाचे नाव व क्र.: | वर्गणी कालावधी |
|---|---|---|

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क

संपर्कात राहू या ! संपर्क वाढवू या !!



कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी
चालविलेले नियतकालिक (खासगी वितरणासाठी)

वर्ष १५ वे | ऑक्टोबर–डिसेंबर २०१९ | अंक ३ रा

अध्यक्ष : श्री. विजय आंबर्डेकर
मोबा. : ९८१९८८५६६५

सचिव : श्री. गणेश गुर्जर
मोबा. : ९८९०९९०११३

कोषाध्यक्ष : श्री. संजय आंबर्डेकर
मोबा. : ९८२०४ १७९८१

संस्था नोंदणी क्र. महा–१४३६/२०१५ दि. २०/१०/१५. पुणे विश्वस्त संस्था नोंदणी क्र एफ४६५२३ पी दि. ३/३/२०१६

## संपादक मंडळ

संपादक : श्री. हेमंत पुराणिक, ९९२३८ १०१९४
उपसंपादक : श्री. गोपाळ भाटवडेकर ९८५०९७९७०६
तंत्रज्ञ : श्री. सचिन ताटके, ९८६७१ ९२३१०
सल्लागार : श्री. प्रदीप हळबे, डोंबिवली–सदस्य ९८३३१६३६५९
सदस्य : सौ. मेघा नाटेकर, ९६३७१५५९४८
श्री. ऋषिकेश पळसुलेदेसाई, ९४०३७ ०२७३४
प्रकाशक : श्री. गणेश गुर्जर, ८१४९९ ०७७८९

### जाहिरातीचे दर

| पान | एक वेळ | चार वेळा |
|---|---|---|
| पाव | रु. ५००/– | रु. २०००/– |
| अर्धा | रु. १०००/– | रु. ४०००/– |
| पूर्ण | रु. २०००/– | रु. ८०००/– |
| शुभेच्छा | रु. ५००/– | रु. २०००/– |
| पूर्ण पान रंगीत | रु. ३०००/– | रु. १२०००/– |
| पृष्ठदान | रु. २००/– | – |

**नियतकालिकाचे नाव** : कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'
**पत्ता** : कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,
**द्वारा** : कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे – ४११ ०३०
**संपादक** : श्री. हेमंत पुराणिक
**मुद्रक** : श्री जे प्रिंटर्स प्रा. लि.
१४१६, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

ऑफिस संपर्क : ०२०–२४४३२४४३ / मो. ८१४९९०७७८९
email : bkbmsindia@gmail.com

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क हे त्रैमासिक मालक, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (ट्रस्ट) यांचेसाठी प्रकाशक श्री गणेश गुर्जर यांनी मुद्रक श्री जे प्रिंटर्स प्रा. लि., सदाशिव पेठ, पुणे येथे छापून ४३७, नारायण पेठ, अनिश प्रासाद अपार्टमेंट, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले.

शहर प्रतिनिधी–

श्री. प्रसाद पंडित, मुंबई, ९८६९१ ५५२१५
श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव, ९४४९० ५१६५३
श्री. प्रदीप हळबे, डोंबिवली, ९८३३१ ६३६५९
श्री. मनीष नवाथे, नागपूर ९८५०३ ३१४६० *
सौ. अंजली माईणकर, सोलापूर, ७७७३९ ७३६७९
श्री. भालचंद्र करंबेळकर, सातारा, ९०११० ६३०३०
श्री. दिलीप ढवळे, रत्नागिरी, ९४२२५ ४९०८५
श्री. मिलिंद पावनगडकर, कोल्हापूर, ९२२५८ ००५८७
श्री. जयंत लघाटे, मुलुंड, ९९६९० ३७३४१
श्री. नरेंद्र पानवलकर, बडोदा, ९४२८२३३१८८
श्री. ऋषिकेश पळसुलेदेसाई, पुणे, ९४०३७ ०२७३४
श्री. शरद खांडेकर, सांगली, ९८२२९ ९५८९२
श्री. गजानन सायनेकर, गोवा, ९९२३७ ९९६९७
श्री. विनायक उमर्ये, जि. सिंधुदुर्ग, ९४२३८ ८०१३८
श्री. अजित सरवटे, ठाणे, ९९८७२ ०५६९०
सौ. सुप्रिया फणसळकर, नाशिक, ९४०३१ ४८७७५

## आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदार, जाहिरातदार, हितचिंतक यांना आवाहन करण्यात येते की, आपली वार्षिक वर्गणी आता रु. ३००/-, रु. ५००/- अशी किमान तीन वर्षे व कमाल पाच वर्षांसाठी स्वीकारली जाईल. कृपया बँकेमध्ये कोणीही स्वत: रक्कम न भरता आपल्या शहर प्रतिनिधींकडे संपर्क साधून जमा करावी (पुण्यातील वर्गणीदारांनी त्यांची संपर्क वर्गणी; कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे-३० च्या कार्यालयात येऊन भरावी. त्यांचे स्वागत आहे). शहर प्रतिनिधींनी सर्व वर्गणी गोळा झाल्यावर सभासदांची यादी, वर्गणी रक्कम आणि रक्कम जमा केलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत पाठवावी. या दोन्ही गोष्टी आल्याशिवाय वर्गणी सभासदाच्या खात्यावर जमा होऊ शकणार नाही. महासंघाचे खाते बँक ऑफ इंडिया, कर्वेनगर, पुणे येथे असून त्याचा क्रमांक 05521011000 4008 असा आहे. IFSC Code BKID0000552 आहे. जाहिरातदारांनी आपल्या जाहिरातीचा मसुदा व चेक फक्त कार्यालयांतच पाठवावा. कृपया मनिऑर्डर पाठवू नये.

# अनुक्रमणिका

संपर्क

संपादक मंडळ

हेमंत पुराणिक
संपादक
मो. ९९२३८ १०१९४

गोपाळ भाटवडेकर
उपसंपादक
मो. ९८५०९ ७९७०६

गणेश गुर्जर
प्रकाशक
मो. ९८९०९९०११३

सचिन ताटके
तंत्रज्ञ सदस्य
मो. ९८६७१ ९२३१०

सौ. मेघा नाटेकर
सदस्य
मो. ९६३७१ ५५९४८

ऋषिकेश पळसुलेदेसाई
सदस्य
मो. ९४०३७ ०२७३४

प्रदीप हळबे
सल्लागार
मो. ९८३३१ ६३६५९

अविनाश मणेरीकर
सदस्य
मो. ९४२२३ ७९८७८

संपादकीय ३
पासवर्ड मॅनेजमेंट अॅप्स ४
माझ्या नजरेतून आमार शोनार बांगला ५
गीता ८
लिपी आणि चिन्हांचा उगम १०
येरे येरे पैसा ...भाग - २ १३
आई १४
प्रो. दत्तोपंत पोतदार यांचे संघाचे द्वितीय संमेलनसमयी झालेले अध्यक्षीय भाषण १५
मेंदूलाही विश्रांती हवी १७
संस्थावृत्त
- सिंधुदुर्ग जिल्हा कऱ्हाडे ब्राह्मण संघ गुणगौरव समारंभ व वार्षिक सभा १९
- वार्षिक सर्वसाधारण व वार्षिक सभा २०१८-१९ १९
- कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली (पू.) जि. ठाणे. १९
- कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर यांचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ २०
- कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर यांचा कोजागरी कार्यक्रम २०
- कऱ्हाडे ब्राह्मण संघ, बडोदे २१
- कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबईची एक अविस्मरणीय अनोखी श्रावण कोजागिरी..... २१
- कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई २३
चालला वारकरी पंढरीला / मूक वेदना २३
आभूषणांची राणी - ऋतुजा २४
सुख २६
विरोध आता कसला करता २६
दिलीप श्रीधर भट - एक बहुश्रुत व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड २७
आली दिवाळी २८
KBBF २९

सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.
तसेच त्रैमासिकामध्ये काही नजरचुकीने मजकूर राहिल्यास क्षमा असावी.

– संपादक

# संपादकीय



नमस्कार मंडळी

दसरा झाला.... आता दिवाळीची तयारी सुरू झाली असेलच? प्रथम सर्व सभासदांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!!! ही दिवाळी तुम्हा सर्वांना सुखा-समाधानाची, आनंदाची, उत्साहाची व सुरक्षेची जावो. याचबरोबर येणारे नववर्ष तुमच्या आयुष्यात आनंद, समाधान, निरामय आयुष्य घेऊन येवो, ही मनापासून सदिच्छा!! या दिवाळीत आपल्या सर्वांसाठी अशीच वैविध्यपूर्ण माहिती असणारा अंक आम्ही घेऊन आलो आहोत. प्रवासवर्णन, टेक्नॉलॉजी, पैसा, यशोगाथा याचबरोबर अजून काही नवी वैविध्यपूर्ण सदरे आणि विविधा नावाचे खास सदर....

सर्व संघांकडून लेख तसेच वृत्तांत मागील अंकात पाठवले जावेत, असे आवाहन वेळेत केले होते; पण आवाहन करूनही कोणत्याही संघांकडून म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाही. तसेच जाहिरातींसाठीसुद्धा आवाहन करूनही कोणत्याही संघांकडून अपेक्षित जाहिराती मिळाल्या नाहीत. मागील अंकामध्ये वाचकांसाठी अभिप्राय आणि पत्ताबदलाचा फॉर्म दिला होता. तो भरून फोटो काढून पाठवण्यास सांगितले होते. पण कोणत्याही सभासदाने ते फॉर्म पाठवले नाहीत. पण पत्ते दुरुस्त झाले नाहीत तर अंक वेळेत मिळत नाही, अंक मिळत नाही म्हणून सभासदांच्या तक्रारी येतात. या तक्रारी पुन्हा येऊ नयेत म्हणून तो फॉर्म पाठवला होता, पण त्यालाही योग्य तो प्रतिसाद मिळाला नाही. याही वेळी संघाकडून लेख तसेच वृत्तांत वेळेत न आल्यामुळे अंकासाठी उशीर झाला. त्याबद्दल संपादक मंडळ दिलगीर आहे.

परंतु येणाऱ्या दिवाळीमध्ये ह्या सर्व त्रुटी दूर करून आपण सर्व मिळून काम करू या.. हा अंक तुम्हा सर्व सभासदांचा आहे. तुम्हाला हक्काचे व्यासपीठ देणारा आहे. त्याचा वापर तुम्ही सर्व सभासदांनी मनमुराद करावा, यासाठी हे संपादक मंडळ कार्यरत आहे. तसेच मागील अंकामध्ये आम्ही काही नवी सदरे सुरू करत आहोत असे सांगितले होते. त्या सदरांना अनुसरून लेख पाठवले आणि जर तुमचे लेख संपादक मंडळापर्यंत वेळेत पोहोचले, तर ते आम्हाला छापणेदेखील सोपे होईल. त्यामुळे आपण सर्वांनीच वेळेची मर्यादा सांभाळू या.

पुनश्च सर्व सभासदांना, त्यांच्या सर्व परिवाराला दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!!! तसेच येणारे नववर्ष सुखा-समाधानाचे, आनंदाचे, ऐश्वर्याचे, निरामय आरोग्याचे जावो, ही मन:पूर्वक सदिच्छा!!!

**संपादक मंडळ**

पुणे, दि. १८/११/२०१९

# पासवर्ड मॅनॅजमेंट ॲप्स

अनुपमा भाटवडेकर
मो. : ९१९८३३२२३४४८

हल्ली मोबाईल असो किंवा PC/लॅपटॉप; तो अनलॉक करण्यापासून ते ॲप्लिकेशन्स वापरण्यापर्यंत जवळपास सगळ्याच ठिकाणी पासवर्ड लागतो. असे किती पासवर्ड ठेवायचे आणि ते लक्षातही ठेवायचे, म्हणून काही जण वापरायला सोपे जावे ह्यासाठी सोपे पासवर्ड ठेवतात; तर काही जण बहुतेक ठिकाणी एकच पासवर्ड वापरतात. पण ह्यामुळे पासवर्ड हॅक होण्याची किंवा कोणी सहज ओळखण्याची शक्यता निर्माण होते.

स्ट्रॉंग पासवर्ड ओळखायला कठीण आणि ठरावीक कालावधीने बदलला गेला पाहिजे, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

अशा वेळी कठीण पासवर्ड लक्षात राहतील किंवा कुणाला सहज मिळतील अशा ठिकाणी ठेवण्यापेक्षा ते ॲप्लिकेशन्सच्या साह्याने मॅनेज करता येतात. जाणून घेऊ या अशाच काही ॲप्लिकेशन्सविषयी.

**१) कीपर :**

हे ॲप्लिकेशन iOS, अँड्रॉइड, विंडोज आणि मॅक ह्या सर्व प्लॅटफॉर्म्सवर आणि ब्राउजर्सवर उपलब्ध आहे. ह्यामध्ये मोबाईलवर बायो-मेट्रिक लॉगिन (फिंगर प्रिंट आणि फेस रेकग्निशन) ची सुविधा उपलब्ध आहे. ह्या ॲप्लिकेशन मध्ये अन्य पासवर्ड मॅनेजर्समधून जसे की 1) password, Dashlane आणि Lastpass मधून सेव्ह केलेले पासवर्ड इम्पोर्टसुद्धा करता येतात. ह्या ॲप्लिकेशन मध्ये आपत्कालीन वेळी तुम्ही ठरवलेल्या व्यक्तीबरोबर पासवर्ड शेअर करण्याची विशेष तरतूद आहे.

**२) लास्टपास :**

लास्टपास हे एक अग्रगण्य पासवर्ड मॅनेजमेन्ट ॲप्सपैकी एक आहे. ह्यामध्ये एक मास्टर पासवर्ड सेट करून फायरफॉक्स, क्रोम, एज, ऑपेरा आणि सफारीमधून सेव्ह केलेले पासवर्ड इम्पोर्ट करता येतात. हे ॲप्लिकेशन तुमच्या PC वरून माहिती काढून टाकायला मदत करते, जेणेकरून ती माहिती अन्य कोणाला मिळणार नाही. हे ॲप्लिकेशन क्लाऊड बेस्ड काम करते, त्यामुळे हे अधिक सेक्युअर्ड आहे. हे ॲप्लिकेशन सेव्ह असलेले पासवर्ड स्कॅन करून कोणत्या ॲप्लिकेशन्सना एकच पासवर्ड आहे आणि कोणत्या ॲप्लिकेशन्सचा पासवर्ड वीक आहे, हेसुद्धा सांगते.

**३) 1Password :**

1Password ने गेल्या काही वर्षांत पासवर्ड मॅनेजमेंट ॲप म्हणून नाव कमावले आहे. ह्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे सगळ्या ॲप्लिकेशन्सशी असणारे ह्याचे इंटिग्रेशन. हे ॲप्लिकेशन विंडोज, मॅक, अँड्रॉइड आणि iOS ह्या सर्वांवर उपलब्ध आहे. हे ॲप्लिकेशन इंटरनेट एक्सप्लोरर वर मात्र काम करत नाही.

ह्या ॲप्लिकेशनमध्ये असलेली एक खास सुविधा म्हणजे, ह्यामध्ये एक ट्रॅव्हल मोड उपलब्ध आहे, जो ॲक्टिव्ह केल्यावर बाकी मशिन्सवर स्टोअर असलेले पासवर्ड काढून टाकण्याचा पर्याय हे ॲप्लिकेशन देते.

**४) Zoho Vault :**

हे ॲप्लिकेशन अँड्रॉइड, iOS मध्ये उपलब्ध असून क्रोम, सफारी आणि फायरफॉक्स ब्राउजर्ससाठी हे वापरता येते. ह्यामध्ये अन्य यूजर्ससोबत लॉगिन शेअर आणि ट्रान्सफर करण्याची सुविधा आहे. हे ॲप्लिकेशन Gmail आणि यासारख्या टू-पेज-लॉगिन वापरणाऱ्या साईट्ससाठी वापरता येत नाही. ह्या ॲप्लिकेशनची सोमवार ते शुक्रवार २४ तास फोन सेवा उपलब्ध आहे.

**५) EnPass :**

EnPass हे ॲप्लिकेशन पासवर्ड लोकल स्टोरेजवर सेव्ह करतं, ज्यामुळे पासवर्ड लीक किंवा हॅक होण्याची संभावना फारच कमी आहे. जर पासवर्ड अन्य ठिकाणी सिंक करायचे असतील तर iCloud, Dropbox, Google Drive असे पर्याय वापरून ते करता येऊ शकतात. हे ॲप्लिकेशन iOS, अँड्रॉइडबरोबरच ब्लॅकबेरीवरसुद्धा उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे हे विंडोज, मॅकसहित लीनक्स आणि क्रोमबुकवर सुद्धा वापरता येते.

**६) LogMeOnce :**

ह्या ॲप्लिकेशनमध्ये नॉर्मल लॉगिनबरोबरच फोटो लॉगिनचासुद्धा पर्याय उपलब्ध आहे. हे ॲप्लिकेशन आपले पासवर्ड आपल्या लोकल ड्राइव्हवर की क्लाऊडवर स्टोअर करायचे ह्याचा ऑप्शन देते. iOS, अँड्रॉइड, विंडोज आणि मॅक ह्यावर उपलब्ध असलेल्या ह्या ॲप्लिकेशनमध्ये एक खास वैशिष्ट्य आहे, ते म्हणजे LogMeOnce MugShot, ह्या फिचरने जर तुमचा फोन जर कोणी ब्रेक करायचा प्रयत्न केला, तर त्याचा फोटो क्लिक करता येऊ शकतो.

# माझ्या नजरेतून आमार शोनार बांगला

श्री. श्रीपाद टेंबे
९१५८०८८०४२

पर्यटन आपल्या प्रत्येकाच्या जीवनातील एक अविभाज्य घटक आहे. प्रत्येक जण कधी ना कधी, कोणत्या तरी कारणाने पर्यटन करतोच. पर्यटन असतो एक सुंदर चित्रपट आणि या चित्रपटाचा निर्माता असतो साक्षात या सृष्टीचा निर्माता परमेश्वर. त्यामुळे त्याने या चित्रपटात आपल्याजवळचे सर्व रंग उधळले आहेत. फक्त आपल्यासाठीच. या पर्यटनामुळे निसर्ग, ओळख-पाळख असलेली-नसलेली अनेक प्रकारची माणसं, विविध बोलीभाषा, माणसाची प्रकृती आणि समाजाची संस्कृती समजण्यास मदत होते असो. जसा पाण्याने वाहण्याचा आपला धर्म सोडलेला नाही, अगदी त्याप्रमाणे पर्यटन निरंतर करण्याचा आमचा छंद गोडी लागल्यापासून आम्ही आजवर सोडलेला नाही. असंच या निरंतर पर्यटनाच्या २०१८चा शेवट कोलकाता, शांतीनिकेतन आणि सुंदरबनला भेट देऊन करण्याचे आमच्या 'दस का दम' या कंपूने ठरविले. बहुतेकांनी युरोप, आशिया व भारताच्या बहुतेक भागांत पर्यटन केले होते आणि आमच्या कंपूतील सुनील विपट यांना कोलकात्याला त्यांच्या नवीन फ्लॅटचा ताबा मिळालेला होता. त्यामुळे सेलिब्रेशन व्हायलाच हवे होते. त्यातून बहुतेकांनी पूर्वेचा हा रंग काही बघितलेला नव्हता. त्यामुळे साहजिकच सगळेच जण आनंदित होते.

नियोजित कार्यक्रमानुसार आम्ही सगळे २३ डिसेंबरला कोलकाता येथे पोहोचलो. फ्रेश झाल्यावर सकाळी ९ वाजता शहरदर्शनासाठी बाहेर पडलो.

आता कोलकाता या महानगराविषयी जेवढे आपण बोलू तेवढे कमीच आहे. आयुष्यात प्रथमच या आमार शोनार बांगलामध्ये पाऊल ठेवले होते. सांस्कृतिक क्षेत्राची भारताची राजधानी मानले जाणारे कोलकाता हे शहर निसर्ग, पर्यावरणाशी सलोखा ठेवणारे आहे. ब्रिटिशकालीन राजेशाही शिल्पकलेचे नमुने, त्याचबरोबर जगातील सर्वांत जास्त संख्येने असलेल्या श्रेष्ठ अशा कवी, लेखक, कलाकार या सर्वाचे सर्वोकृष्ट उदाहरण आहे इतर देशांतील शहरांना भेटी देऊन आलेले पर्यटक जेव्हा कोलकाता या महानगराचे दर्शन किंवा पर्यटन करतात, तेव्हा त्यांना हे नक्कीच जाणवते की, हे शहर स्वतःच्या सौंदर्याचे मंत्रस्तवन करीत आहे. हे शहर म्हणजे कलांच्या विविध दालनांत, संगीत, साहित्यात परिपूर्ण आहे. आशिया खंडातील हे शहर इथे भेटीस येणाऱ्या पर्यटकांसमोर इतिहासाच्या वरच्या पायरीपासून चालत-चालत खाली येते आणि त्यांना जुने राजप्रसाद, मंदिर, चर्च, राजकला यांचे विहंगम दर्शन घडवते. कोलकाता शहर हुगळी (गंगा, पद्मा) नदीच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्यावर वसलेले आहे. या हुगळी नदीच्या विशाल पात्रावर दोन मोठे विश्वविख्यात पूल आहेत. रवीन्द्रसेतू म्हणजेच विख्यात हावडा ब्रिज आणि दुसरा विद्यासागर सेतू. या सेतूच्या जवळ असलेले शहराचे दोन भाग म्हणजे बालीगंज आणि कालीघाट हे प्रचंड वर्दळीचे भाग असल्याचे आढळून आले. इथे जास्त काळ थांबणाऱ्या पर्यटकाला या शहराला परत-परत भेट देण्याची नशाच चढते.

आम्ही थोडचाच वेळात जगप्रसिद्ध अशा बेलूर मठ या ठिकाणी पोचलो. मठाचा परिसर चाळीस एकरांमध्ये पसरलेला आहे. मठाचा परिसर अत्यंत स्वच्छ, वातावरण शांता आणि भारावून टाकणारे आहे. रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद यांच्या व्यक्तिगत वापरातील वस्तू प्रदर्शनासाठी ठेवलेल्या आहेत. मठाच्या परिसरात श्री रामकृष्ण मंदिर श्री शारदादेवी मंदिर, स्वामी विवेकानंद मंदिरशिवाय स्वामी विवेकानंद यांचे राहण्याचे ठिकाण आवर्जून बघितले पाहिजे. या परिसरात असलेल्या कोणत्याही मंदिरात ध्यान करण्याची परवानगी नाही; त्याचप्रमाणे फूल, फळ किंवा प्रसाद अर्पण करण्याची पद्धत नाही. बेलूर मठाच्या शांत आणि पवित्र वातावरणातून बाहेर आल्यावर हुगळी नदीच्या दुसऱ्या किनाऱ्यावर असलेल्या दक्षिणेश्वर काली मंदिराचे दर्शन आपल्याला होते. या मंदिराला खूप मोठा इतिहास आहे. राणी रासमणीला झालेल्या साक्षात्कारामुळे गंगेच्या काठावर या अतिशय सुंदर मंदिराची निर्मिती केली. कालीमातेचे दर्शन घेऊन बाहेर आल्यावर मंदिर परिसरात रामकृष्ण परमहंस यांची धर्मपत्नी श्री शारदामाता आणि राणी रासमणी यांचे समाधी मंदिर आहे. मंदिराच्या भारावलेल्या आध्यात्मिक वातावरणातून आम्ही आमचा मोर्चा मार्बल हाऊस किंवा मार्बल पॅलेसकडे वळवला.

मार्बल हाऊसची निर्मिती १८३५ मध्ये राजा राजेंद्र मुलिक या गर्भश्रीमंत व्यापाऱ्याने केली. या महालात अनेक सुंदर भारतीय आणि पाश्चिमात्य अशा मौल्यवान वस्तू, पेंटिंग्ज, घड्याळे, आरसे, संगमरवरी पुतळे यांचा मोठा व सुंदर संग्रह आहे. ही एक खासगी संपत्ती

आहे. या ठिकाणी कोणतेही प्रवेश शुल्क नाही, पण मंगळवार आणि गुरुवारी हे संग्रहालय पर्यटकांसाठी बंद असते. मार्बल हाऊस बघितल्यानंतर आम्ही व्हिक्टोरिया मेमोरियल ज्याला कोलकाता शहराचे आयकॉनदेखील म्हटले जाते. अशा जगप्रसिद्ध वास्तुदर्शनासाठी आलो.

१९०६ ते १९२१ च्या दरम्यान निर्मित वस्तुकलेचा उत्कृष्ट नमुना आणि प्रेक्षणीय असे मेमोरियल राणी व्हिक्टोरियाला समर्पित आहे. मेमोरियलच्या आत भव्य संग्रहालय आहे. या संग्रहालयात राणीचे भले मोठे पियानो, स्टडी डेस्कासोबतच अन्य जवळपास तीन हजारपेक्षा जास्त वस्तू बघण्यासाठी पर्यटकांना उपलब्ध आहेत. कोलकाता शहरातील महत्त्वाची आणि प्रत्येकाच्या मनात एक वेळ तरी भेट देण्याची इच्छा असलेली महत्त्वाची स्थळं जरी बघून झाली होती, तरी आणखीन बरीच ठिकाणे बघण्यासारखी आहेत. परंतु वेळ कोणासाठी थांबत नाही, त्यामुळे जो काही वेळ आमच्याजवळ होता त्या वेळेत आम्ही प्रिन्सेस घाट मेमोरियल, इडन गार्डन, सायन्स सेंटरला धावती भेट दिली. आम्ही सारेच जण वय वर्षे ५५ च्या पुढे होतो. त्यामुळे बहुतेकांना पायांचे तुकडे पडत असल्याची जाणीवही प्रकर्षाने होऊ लागली होती. त्यामुळे पुन्हा संधी मिळाल्यास सगळे मनभरून पाहण्याची अनिवार इच्छा मनात घेऊनच आम्ही या महानगराला सलाम केला आणि घरी परतलो. सकाळी ६ वाजता साहित्याचे नोबल पारितोषिक विजेते, विश्वख्याति-प्राप्त गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या शांतिनिकेतन येथे जायचे होते.

सकाळी ९ वाजता नियोजित कार्यक्रमानुसार आम्ही बोलपूर या शहरापासून अवघ्या तीन किलोमीटर दूर असलेल्या शांतिनिकेतन येथे गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्याद्वारे स्थापित विश्वभारती विश्वविद्यालयाच्या परिसरात आलो. शांतिनिकेतन पश्चिम बंगालच्या बीरभूम या जिल्ह्यात आणि कोलकातापासून १५० किलोमीटर अंतरावर आहे.

**शांतिनिकेतन विश्वभारती**
**विश्वविद्यालय परिसर–**
विश्वभारती विश्वविद्यालय गुरुदेव
रवींद्रनाथ टागोर याचे निवासस्थान
पौष मेळाव्याचे दृश्य
बोलाई गीतकार-गायक
गुरुकुल

हे ठिकाण म्हणजे आपल्या देशातील एक प्रमुख सांस्कृतिक केंद्र आहे. शैक्षणिक उत्कृष्टता, कुटीर उद्योगांवर भर, उत्तम व्यवस्थापन या सगळ्या गोष्टींचे सुंदर उदाहरण इथे आपल्याला बघायला मिळते. त्यामुळे शांतिनिकेतन पश्चिम बंगाल राज्याच्या प्रमुख आकर्षणांपैकी एक आहे. येथे रवींद्रनाथ टागोर यांनी स्थापन केलेल्या विश्वभारती विश्वविद्यालयाला १९५१ मध्ये विश्वविद्यालयाचा दर्जा मिळाला. या ठिकाणी नावीन्यपूर्ण असे विषय- जसे तर्क-वितर्क, चर्चासत्र, ओपन एअर क्लासरूम इत्यादी गोष्टींवर भर दिला जातो. या विश्वभारती विश्वविद्यालयाच्या ख्याति-प्राप्त विद्यार्थ्यांमध्ये श्रीमती इंदिरा गांधी, सत्यजित रे, अमर्त्य सेन, आर. शिवकुमार, सुचित्रा मित्रा यांचा समावेश आहे.

विश्वविद्यालयाच्या परिसरात व आजूबाजूला महत्त्वाची आवर्जून बघाव्यात, भेट द्याव्यात अशा बऱ्याच गोष्टी आहेत. जसे टागोर आश्रम हा १८६३ मध्ये देवेंद्रनाथ टागोर ब्राह्मो समाज आश्रम आणि विद्यालय स्वरूपात स्थापित आश्रम, त्यानंतर छतीमताला या जागेवर देवेन्द्रनाथ टागोर ध्यान करायचे ठिकाण. थोडेसे समोर गेल्यावर रवीन्द्र भवन संग्राहलय आहे. या संग्रहालयात स्मृति-चिन्ह, पेंटिंग्ज, असंख्य मौलिक वस्तू आणि ४०००० मौल्यवान पुस्तकांचा संग्रह आहे. बाजूलाच असलेल्या श्रीजनी शिल्पग्राम येथे संथाल संस्कृती, स्थानिक कला आणि संस्कृतीचा संगम आपल्याला दिसतो. या परिसरात फिरताना सगळे वातावरण कसे आपल्याला एका वेगळ्याच भूमिकेतून विचार करायला भाग पाडत असते.

शांतिनिकेतनमध्ये साजरे केले जाणारे सण हे निसर्गाशी निगडित आहेत. २५ बोईसाई आणि २२ साब्रान या कॅलेंडरच्या तारखा किंवा तिथीशिवाय





बसंत उत्सव होतो. बरशा मंगल, शारदोत्सव आणि नंदन मेला हे महत्त्वाचे सण साजरे केले जातात. त्याचप्रमाणे पौष महिन्यात तीन दिवसांचा मेळा हे महत्त्वाचे दिवस साजरे केले जातात. या मेळ्यात बहुतेक कुटीर उद्योगात निर्माण झालेल्याच वस्तू विक्रीसाठी उपलब्ध असतात. या मेळ्यात संगीताची अनोखी मेजवानी असते. या संगीत कार्यक्रमात रवींद्र संगीत आणि विशेषकरून बाउल बिरादरीच्या लोकसंगीताचा मनसोक्त आनंद घेता येतो. हे बाउल लोक धार्मिक टीका न करता आध्यात्मिक रूपात गातात. इस्लामच्या सूफी संतांसारखे या बाउल लोकांचा बंगाली समाज आणि संस्कृतीवर खूप प्रभाव दिसून येतो. आम्हाला या प्रभावातून लवकर बाहेर पडणे गरजेचे होते, कारण कोलकाता येथे परत जाऊन सकाळी सुंदरबनला पोचायचे होते.

सुंदरबन... नावातच रमणीयता, सौंदर्य ओथंबून भरलं आहे. भारतातील वेगवेगळ्या जंगलप्रकारांतील एक आगळवेगळं जंगल. याच वैशिष्ट्य म्हणजे प्रचंड दाट खारफुटीचे हे जंगल आहे. ही खारफुटी बघायला सुंदरबनला कां जावं, असा प्रश्न अनेकांना पडेल; पण खारफुटी फळाफुलांनी लगडलेल्या आणि

सुंदरही असतात, यावर विश्वास बसायला हवा, म्हणून तरी हे सुंदरबनचे जंगल प्रत्येकाने नक्कीच पाहायला हवं, तरच त्याचं सौंदर्य आपल्या नजरेला कळेल. सुंदरबनमध्ये सगळी ठिकाणे बेटांवर विभागलेली आहेत. कोलकातापासून अंदाजे १०० किलोमीटरचा हा प्रवास अतिशय छान आणि टुमदार अशा लहान-लहान गावांतून सुरू होतो. बहुतेक सगळी घरं चंद्रमौळी. प्रत्येक घराभोवती एक तळे दिसले. घराच्या आजूबाजूला नारळ, पोफळी, केळी आणि फुलझाडे अशा अनेक झाडांची गर्दी दिसून आली. गोसाबा या गावाजवळ एका छोट्या बोटीत बसून आमचा नदीचा प्रवास सुरू झाला. सुंदरबन हे व्याघ्रप्रकल्पासाठी ओळखले जाणारे जंगल. या ठिकाणी पाच नद्या एकत्र येतात, शिवाय समुद्राचे पाणी खाडीच्या रूपाने त्यांना येऊन मिळते. सुंदरबनच्या १०२ बेटांपैकी ६५ बांगला-देशात आहेत. या बोटी आकाराने छोट्या असल्या तरी त्यात सर्व सोई असतात अगदी किचन, टॉयलेट्स, विश्रांतीसाठी बेड्स, वगैरे. थोड्याच वेळात आम्ही नेतीदोपानी या ठिकाणी आलो. इथे असलेल्या वनविभागाच्या ऑफिसबाहेर फलकावर वाघ केव्हा या ठिकाणी आला होता याच्या नोंदी होत्या. वाघ येऊन गेल्याची शेवटची नोंद दोन आठवड्यांपूर्वीची होती. बहुधा आम्ही येणार, हे त्या भागातील वाघांना कळले असावे. असो. जवळच असलेल्या वनदेवीच्या मंदिरासमोर दोन मोठाले वृक्ष आहेत. या विशाल वृक्षांची मुळे जाड आणि जमिनीवर लांबच लांब पसरलेली होती. त्यामुळे जणू काही मुळांचा गालिचा जमिनीवर अंथरलेला आहे, असे भासत होते. निसर्गाची करामत बघायला मिळाली याचे समाधान वाटले.

पाण्याला ओहोटी लागल्यामुळे सर्व झाडे जमिनीवर दिसत होती, पण हीच झाडे भरतीच्या वेळी पाण्यात पोहत असल्याचा भास होतो. ओहोटी असल्याने आमची बोट एका छोट्या कॅनॉलमधून जात होती. त्यामुळे झाडांवर बसलेले व उडणारे विविध प्रकारचे पक्षी बघायला मिळाले. नदीच्या दोन्ही किनाऱ्यांना वाळूची दलदल आणि त्यातली झाडं म्हणजे जणू निसर्गाने आपल्यासमोर स्वागतासाठी झाडांची रांगोळी काढली आहे, असं भासत होतं. जिकडे-तिकडे पाणीच पाणी होते. बेट नेमकं कसं असतं, हे प्रत्यक्ष बघण्याचा आनंद काही औरच असतो. भरती सुरू झाल्यामुळे पाण्याची पातळी हळूहळू वाढू लागली होती. क्षणातच आजूबाजूचे दृश्य पार बदलून गेले. वाळूची दलदल नाहीशी झाली. बोटीचा प्रवास कॅनॉलमधून होता. समुद्रातूनच होतो आहे, असं वाटू लागलं. बाजूचे खारफुटीचे जंगल आमच्या बोटीसारखे पाण्यावर तरंगत आहे, असं भासत होतं. या जंगलातील पाम या झाडाचे विविध रंग बघायला मिळतात ही पामची झाडे एकमेकांत इतका मिसळलेला असतात की, वाघ कुठे झाडीत लपला तर कोणाला दिसणार नाही, म्हणून या झाडांना टायगर पाम असेही म्हणतात.

सुधानोखाला या बेटावर नेतीदोपानी हे नवे जंगल तयार केले आहे आणि सध्या सुंदरबन अभयारण्यात अंदाजे ३०० वाघ आहेत, असं वनविभागातर्फे सांगण्यात आले. इथे एक संग्रहालय आहे. त्यात छोट्या काचेच्या बरण्यांतून प्राण्यांच्या शरीरातील यकृत, हाडे अन्य अवयव भरून ठेवले आहेत. भिंतीवरील चित्रांमधून त्या भागातील आदिवासींचे जीवन उभे केले आहे. थोड्या अंतरावर



असलेला मगरींचा बगीचा म्हणजेच क्रोकोडाईल पार्क आहे. सुंदरबन येथे वॉटर मॉनिटर लिझार्ड, माशांचे असंख्य प्रकार, वेगवेगळ्या रंगाचे किंग फिशर (खंड्या), लेसर व्हिसलिंग डक, ग्रीन बी इटर, ब्राह्मणी घार, घोरपड यासारखे असंख्य पक्षी आणि त्यांच्या पोटजाती विहार करताना आपण बघू शकतो. फक्त व्याघ्र दर्शन हे संयमाची परीक्षा पाहणारे असले तरी हा ताटकळत ठेवणारा, उत्सुकता वाढवणारा, खरे तर नको असलेला काळ व्याघ्रदर्शन या कल्पनेनेही अपरमित आनंद देऊन जाणारा असतो. यासाठी वनविभागाने वेगवेगळ्या बेटांवर खास वॉच टॉवर्सदेखील उभारले आहेत. काही ठिकाणी पाणी पिण्यासाठी आलेल्या वाघांच्या पंजांचे ठसे दिसले. एवढेच काय, ते व्याघ्रदर्शनही आम्हाला झाले.

या भागातील जीवनशैली एकदम खास आहे. माशांचे विविध प्रकार, जगप्रसिद्ध बंगाली मिठाई, मिष्टी दोई आणि भात या पदार्थांचा जेवणात विशेषकरून समावेश असतो. शिवाय पर्यटनाच्या दृष्टीने विकसित झालेल्या या प्रदेशामध्ये वेगवेगळ्या बेटांवर रिसॉर्ट माफक दरात उपलब्ध आहेत. किमान आवश्यक सुखसोई आपल्या सेवेसाठी तयार ठेवल्या आहेत.

अशा रीतीने आम्ही आमची चार दिवसांची धावपळत का होईना कोलकत्ता, शांतिनिकेतन व सुंदरबनच्या छान-छान आठवणींची शिदोरी घेऊन आणि सोबत पुन्हा संधी मिळाल्यास अत्यंत आवडीने व आनंदाने सगळं मन भरून पाहण्याची अनिवार इच्छा मनात घेऊनच सहलीचा निरोप घेतला. तुमचे काय? करताय ना तुम्ही तयारी? शुभास्ते प्रस्थानः सन्तु!

# गीता

**मीना फणसळकर, पुणे**
मो. नं. : ७५८८२३०१२२

गीतेची ओळख आपल्या हिंदू धर्मीयांना नवी नाही. ५००० वर्षांपूर्वी श्रीकृष्णाने अर्जुनाला प्रबोध करण्याच्या निमित्ताने संपूर्ण जगाला शाश्वत असे जीवन जगण्याचे शास्त्रच सांगितले आहे. समाजात, दुर्दैवाने त्याचे चिंतन न होता फक्त पूजनच झाले. आजही ज्ञानेश्वरी, रामायण, महाभारत, दासबोध या ग्रंथांबरोबर गीताही घराघरांत पाहायला मिळेल; पण ह्या सगळ्यांची पारायणे करण्यासाठीच हे ग्रंथ आहेत, असे समजून त्यातून म्हणावा तसा बोध घेतला गेला नाही.

या सर्व ग्रंथांत गीतेचे महत्त्व का ? तर–

**या स्वयं पद्मनाभस्य मुखपद्माद्विनिसृता ।**

ती प्रत्यक्ष भगवंतांच्या मुखातून स्रवलेली आहे. त्यातील प्रत्येक श्लोक हा 'मंत्र' आहे. गीतेतील प्रत्येक श्लोक म्हणजे जीवनातील सूत्र आहे. ज्याप्रमाणे गणितातील सूत्रांचा किंवा विज्ञानातील सूत्रांचा उपयोग करून गणिते किंवा विज्ञानातील प्रश्न सोडवतो, त्याचप्रमाणे गीतेतील या श्लोकरूपी सूत्रांचा उपयोग करून जीवनातील गणितांची उत्तरे शोधायची आहेत.

यासाठी गीतेचा समग्र अभ्यास हवा. प्रत्येक हिंदू माणसाला किंबहुना- जगातील प्रत्येक माणसाला गीतेचा अभ्यास आवश्यक आहे.

तुम्ही म्हणाल– गीता शिकली पाहिजे, तिचा अभ्यास केला पाहिजे, तिचं चिंतन केलं पाहिजे– असे सगळे नुसते म्हणतात; पण त्यासाठी मार्गदर्शन करणारं कोणी आहे का? गीता संस्कृतमध्ये आहे. आम्हाला तर संस्कृत येत नाही. आम्हाला समजेल असं कोणी सांगणारं-शिकवणारं आहे का?

हो, आहे. पुण्यातील सदाशिव पेठेतील 'गीताधर्म मंडळ' ही संस्था गीतेचा प्रसार सर्वत्र व्हावा यासाठी कार्यरत आहे. ह्या संस्थेची स्थापना लोकमान्य टिळकांचे नातू ग. वि. केतकर व सदाशिवशास्त्री भिडे यांनी २३ जुलै १९२४ रोजी केली. येथे गीता-संथेबरोबरच वेगवेगळे उपक्रम घेतले जातात. गीताव्रती, ज्ञानेश्वरी प्रबोध, तुकाराम गाथा या विषयांवर मार्गदर्शन केले जाते आणि त्याच्या परीक्षा घेतल्या जातात. त्यातील गीतासंथा वर्ग एक प्रभाग आहे.

गीतेचा समग्र अभ्यास करण्यातली पहिली पायरी म्हणजे ती शुद्ध उच्चारणात म्हणता येणे. तिचा साधा-सरळ संस्कृतातील अर्थ लक्षात आला पाहिजे आणि त्यावर चिंतन होऊन त्यातील 'लक्ष्यार्थ' ध्यानात आला पाहिजे.

गीतासंथा वर्गात प्रथम गीता शुद्ध उच्चारणात म्हणण्यास शिकवले जाते. प्राचीन काळी इ.स. पूर्वी ३ ते ५ हजार वर्षांपूर्वी संस्कृत लिखित स्वरूपात येण्यापूर्वी वेद, उपनिषदे वगैरे सर्व गुरुमुखातून श्रवण करून शिष्य ग्रहण करायचे. ते शिष्य पुढे मोठे झाल्यावर गुरुस्थानी येत. आपल्या शिष्यांना आपण जसे श्रवण करून शिकले तसे सारे शिकवीत. अशी परंपरा चालू होती. स्वत: लक्षपूर्वक श्रवण करायचे – ऐकायचे, पाठ करायचे व कानामात्रेचाही फरक न करता पुढील पिढीला सुपूर्त करायचे. गुरू (शिक्षक) जसे उच्चार करतील, शिकवतील; तसेच्या तसेच उच्चारण शिष्याने करायचे, यालाच संथा असे म्हणतात.

उच्चारण शास्त्रोक्त पद्धतीने व लयबद्ध व्हावे यासाठी महामुनी व्याकरणशास्त्रकार पाणिनी यांच्या नियमांचा आधार घेतला आहे. आपण वर्णांचा (अक्षरांचा) उच्चार करतो, त्यांची तोंडातील स्थाने ठरलेली आहेत. त्या-त्या स्थानांच्या उपयोगानेच, म्हणजे तोंडातील त्या-त्या स्थानांना स्पर्श करून नाभीपासून निर्माण होणाऱ्या ध्वनीचा तो घशात आल्यावर आपण वर्णाचा उच्चार करतो. कण्ठ, तालू, मूर्धा (ज्याला आपण टाळू म्हणतो), दन्त, ओष्ठ (ओठ) अशी तोंडातील स्थाने होत.

| स्थान | स्वर | वर्गव्यंजने | अनुनासिके | वर्ण |
|---|---|---|---|---|
| कण्ठ | अ, आ | क्, ख्, ग्, घ्, क्ष | ङ् ह् | कण्ठ्य |
| तालु | इ, ई | च्, छ, ज, झ्, ज्ञ, य् | ञ् य् | तालव्य |
| मूर्धा | ऋ, ॠ | द, ठ्, ड्, ढ् | ण् ष् र् | मूर्धन्य |
| दन्त | – | त्, थ्, द्, ध् | न्, ल्, स् | दन्त्य |
| ओष्ठ्य | उ, ऊ | प्, फ्, ब्, भ् | म् व् | ओष्ठ्य |
| (क्, च्, ट्, त्, प् हे पाच वर्ग म्हटले आहेत.) | | | | |

वर्गामध्ये पाणिनीच्या व्याकरण-शास्त्रानुसार परसवर्ण पद्धतीने शिकवले जाते. शिकण्यासाठी संस्कृतचा पूर्व अभ्यास आवश्यक आहे असे नाही, फक्त वर्गाला नियमित येणे महत्त्वाचे. हे गीतासंस्था वर्ग पुण्यामध्ये वेगवेगळ्या भागांत विनामूल्य घेतले जातात. जसे- कोथरूड, कर्वेनगर, एरंडवणे, बावधन, पाषाण, पौड रोड, वारजे, बिबवेवाडी, सहकारनगर, पिंपरी, चिंचवड, तळेगाव, विमाननगर, विश्रांतवाडी, येरवडा, वडगावशेरी इ. साधारणत: सोमवार ते शुक्रवार असे रोज वर्ग घेतले असता, वर्षभरात गीतेच्या १८ अध्यायांची संथा पूर्ण होते. शिकवणारे शिक्षक हे तयार असतात. त्यांचीसुद्धा उच्चारणाची परीक्षा कसून घेतली जाते व ज्यांना A Grade मिळाली आहे, त्यांनाच शिकवण्याची परवानगी दिली जाते. त्यामुळे जे विद्यार्थी चांगले म्हणणारे आहेत, तेच पुढे शिक्षक झाले आहेत आणि त्यांनी आपापल्या भागात वर्ग सुरू केले आहेत.

संथा वर्गांमध्ये संथेव्यतिरिक्त वक्तृत्व, पाठांतर, लिखाण, स्पर्धा (गीतेच्याच अनुषंगाने) घेतल्या जातात. गीतेच्या संदर्भात असलेले 'कर्माचा सिद्धांत' या पुस्तकाचा अभ्यास, गुरू पौर्णिमेच्या कार्यक्रमात विद्यार्थी ऋषितुल्य व्यक्तींवरची माहिती गोळा करून आपल्या भाषेत बोलतात. वर्षातून ३ वेळा पाठांतर स्पर्धा असतात. गोकुळाष्टमीचा कार्यक्रम साजरा केला जातो; ज्यामध्ये कृष्ण, गीता या विषयांशी निगडित विविध कार्यक्रम साजरे केले जातात. नाट्यछटा, नृत्य, गवळणी, कृष्णावरील गाणी, टिपरी नृत्य सादर केले जाते. हा गोकुळाष्टमीचा कार्यक्रम म्हणजे विद्यार्थ्यांचे वार्षिक स्नेहसंमेलनच असते. मोठ्या विद्यार्थ्यांना आपण परत शाळा-कॉलेजमध्ये गेलो आहोत की काय, असे वाटते. वर्षाच्या शेवटी सांघिक, वैयक्तिक स्पर्धा असतात. त्या वेळी गीताधर्म मंडळ एक गोकुळच होऊन जाते. अशा तऱ्हेने संपूर्ण वर्ष भरगच्च कार्यक्रम, अभ्यास यांनी युक्त असते. वर्ष कसे संपते, ते कळतच नाही आणि नकळत तो कृष्ण, त्याची गीता ह्याचा अभ्यास आणखी करावा असे वाटून गीताधर्म मंडळामध्ये पुढील अभ्यासाविषयी विचारणा होते. आम्हा सर्व शिक्षकांचा अनुभव आहे की, वर्षानंतर सर्व विद्यार्थी सांगतात- आमच्यामध्ये निश्चित सकारात्मक बदल झालेला आहे.



गीता शुद्ध म्हणता येऊ लागली की, त्याबद्दल अर्थ जाणून घेण्याची, त्याचा सखोल अभ्यास करण्याची जिज्ञासा निर्माण होऊ लागते. कारण संथा वर्गात श्लोकांचा अर्थ व थोडक्यात निरूपण पण केले जाते. अशा जिज्ञासू लोकांसाठी 'गीता पाठशाला' हा उपक्रम आहे, ज्यामध्ये संस्कृत व्याकरणाचा थोडा अभ्यास व अर्थाकडे विशेष लक्ष दिले जाते. ज्यांना अर्थाचा आणखी सखोल अभ्यास करायचा आहे, त्यांच्यासाठी 'गीताव्रती' आहे. तसेच ज्ञानेश्वरी प्रबोध, तुकाराम गाथा या ग्रंथांच्या अभ्यासाविषयीसुद्धा मार्गदर्शन केले जाते. त्याच्याही स्पर्धा घेतल्या जातात.

काही वर्षांपूर्वी शृंगेरी विद्यापीठाच्या शंकराचार्यांनी घोषित केले होते की, जो गीतेतील १८ अध्याय शुद्ध उच्चारात म्हणून दाखवेल, त्याला रु. २१ हजारांचे पारितोषिक दिले जाईल. त्यामुळे गीताधर्म मंडळाच्या वतीने चालू असलेल्या गीतासंथा वर्गातील दर वर्षी किमान १०/१५ विद्यार्थी गीता कंठस्थ करून, शृंगेरीला जाऊन रु. २१ हजारांचे पारितोषिक मिळवून येतात. आतापर्यंत त्यांची संख्या ४००च्या वर गेली आहे.

आणि मला सांगायला अभिमान वाटतो की, या 'गीताधर्म मंडळ' संस्थेशी मी गेली ९ वर्षे संलग्न आहे. मी २००७ मध्ये श्रीमती कुसुमताई चौधरी व सौ. आशा कोलते यांच्याकडून गीतेची संथा घेतली. २०१० मध्ये शृंगेरी येथे जाऊन रु. २१००० चे पारितोषिक मिळवले. गीता पाठशाळेचा अभ्यास करून २००९ पासून एरंडवणे भागात नळस्टॉप, श्यामाप्रसाद मुकर्जी गार्डनजवळील विरंगुळा केंद्र, अर्चनानगर कॉलनी येथे वर्ग घेते. तसेच नळस्टॉप येथे असलेल्या वासुदेव निवास येथे गीता व विष्णुसहस्रनाम यांचे वर्ग घेते. शिवाय लॉ कॉलेज येथील पंडितराव आगाशे शाळेत माझ्या सहशिक्षिकेबरोबर मुलांना त्यांना समजेल, आकलन होईल, या पद्धतीत गीता शिकवते.

या सर्वाचे श्रेय मी माझ्या गुरू श्रीमती वसुधाताई पाळंदे (गीता धर्म मंडळातील संथा वर्गाच्या संचालिका), श्रीमती कुसुमताई चौधरी, सौ. आशाताई कोलते व श्रीमती शुभांगीताई जोशी यांना देते. या सर्वांनी मला या सर्व वाटचालीत अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले आहे, त्याबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहे. हे सर्व करत असताना घराकडे कधी कधी थोडे दुर्लक्ष होते, पण मुले व नवरा सांभाळून घेतात.

# लिपी आणि चिन्हांचा उगम

श्रीरंग श्री. हिर्लेकर, अमरावती
मो. न. ९४२२१११८९३

भाषा या शब्दातून भाषण म्हणजे बोलणे हा अर्थ ध्वनित होतो. ह्या भाषणाचे दृश्य रूप म्हणजे लेखन. हे लिखाण ज्या आकृतींद्वारे केले जाते, त्या आकृती म्हणजे अक्षरे आणि अशा अक्षरांचा समूह म्हणजे विशिष्ट लिपी. थोडक्यात सांगावयाचे तर, ध्वनीचे दृश्य आणि मानवनिर्मित रूप म्हणजे लिपी. मात्र दर वेळेस हे वेगळे असलेले आढळते. देवनागरीतील क, ख, ग इंग्रजीत k gh, g असे दाखवतात. ही विविधता का येते? आणि या विविधतेतही काही साधर्म्य असावे का? असले पाहिजे.

१) वेगळेपणा फक्त लिहिण्याच्या पद्धतीततच असतो असे नव्हे, तर कधी उच्चार असे असतात की, त्याकरता काही लिपींमध्ये निराळी चिन्हे दाखवतात तर दुसऱ्या लिपीमध्ये ते उच्चार दाखवताच येत नाहीत. अशा वेळेस निराळे चिन्ह न वापरता एकाच चिन्हावर काम केले जाते. उदा. आपल्याकडे १) त आणि ट, २) थ आणि ठ, ३) द आणि ड, ४) ध आणि ढ, ५) न आणि ण, ६) श आणि ष, ७) ल आणि ळ अशा ७ गुणिले २ बरोबर १४ अक्षरांकरता १४ स्वतंत्र चिन्हे आहेत; तर इंगजीत अनुक्रमे हे काम ७ चिन्हांतच केले जाते. फार काय, पण मूळ इंग्रजीचे संस्कार पिढ्यान्‌पिढ्या झालेल्या लोकांना हा अक्षरांतील फरक उच्चारताना स्पष्टपणे येतही नाही. त्यांच्या जिभेला ते वळणच नसते. आपल्याकडेही श आणि ष मधील फरक प्रख्यात गायक श्री. सुधीर फडके जितक्या स्पष्टपणे ऐकवू शकत, ते सर्व मराठी व्यक्तींना जमतेच असे नाही. फार काय, पण ड च्या ठिकाणी ळ उच्चारणारे आढळतात. उदा.- कडी न म्हणता ते कळी म्हणतात आणि कमळऐवजी कमड असेही नि:संकोचपणे बोलतात.

२) कधी असेही आढळते की, एका भाषेतील विशिष्ट अक्षरे दुसरीकडे असतीलच असे नाही. उदा.- आपल्याकडील ण, ळ ही अक्षरे. इंग्रजीत हे उच्चार अजिबात नाहीत. ऋ, लृ, ष यांचा स्पष्ट उच्चार करणे हे कठीण काम आहे.

हे झाले मानवी स्वरयंत्राविषयी. काही पक्ष्यांचे आणि काही यांत्रिक रचनेतून उत्पन्न झालेले आवाज आपण उच्चारू शकत नाही. वटवाघळांचा आवाज आणि महासागरातील हजारो कि.मी. अंतरावर राहणाऱ्या दोन शार्क माशांचे लघुलहरींद्वारे सुरू असलेले संभाषण आपल्या जाणवतही नाही, मग उच्चारणे तर दूरच! आणि जर त्याचा उच्चारच आपल्याला शक्य नाही, तर ते आवाज लिपीद्वारे कागदावर दर्शविणे म्हणजे केवळ अशक्यच.

आपल्या स्वरयंत्रातून उच्चारलेल्या अक्षरांची आकृती म्हणजे जर लिपी, तर यात इतके वैविध्य का असावे? प्रत्येक भाषेची लिपी निराळी म्हणावी, तर तेही बरोबर नाही. मराठी, संस्कृत, हिन्दी या आज एकाच देवनागरी लिपीत लिहिल्या जातात. अशी अनेक उदाहरणे आहेत. आज जगात शेकडो पद्धतीच्या लिपी असून हजारो लिपी नष्टही झाल्या आहेत. अनेक लिपीतज्ज्ञ नष्ट झालेल्या लिपीतील लिखाण उत्खननात आढळले की, त्यांचा अर्थ लावू लागतात. तो अर्थ लावताना अनेक ऐतिहासिक संदर्भ, पुरावे, त्या काळची परिस्थिती, राहणीमान, सामाजिक प्रगती इत्यादी सर्व विचारात घ्यावे लागते. अनेकदा गुप्ततेच्या दृष्टीने कूट भाषेत, काही कूट अक्षरांत आणि चिन्हांत लिखाण केले जाते. आजची बारकोड पद्धत ही संगणकीय गूढ लिपी आहे. उभ्या आणि आडव्या रेषा, ठिपके, अंक, त्यांचा आकार, दोन चिन्हांमधील अंतर या सर्वांमागे निश्चित असा एक नियम (लॉजिक) आहे. तो समजून घेतला की त्या गुप्त संदेशांतील अक्षरे आणि एकूणच माहिती समजू लागते. हे कोडिंग करणारेही थोर आणि त्यांचे डी-कोड करणारे त्यांच्यापेक्षाही थोर. चोराच्या खुणा चोरालाच माहीत, ही म्हण अशा वेळी एकदम पटते.

ज्या अर्थी हजारो वर्षांपूर्वीच्या लिपींचे हे डी-कोडिंग करून मूळ लिपी शोधून तिचा अर्थ लावण्यात तज्ज्ञ मंडळींना यश मिळते, त्या अर्थी त्यांच्या यशामध्ये त्यांनी असे कोणते मुद्दे विचारात घेतले असावेत? त्यांना लिपीतील आकृतीतून असे काय प्रतीत होते की, ती अगम्य अक्षरे त्यांच्याशी आपले रहस्य बोलू लागतात? देवनागरीतील अ हा असाच का आणि त हा तसाच का?

१) इंग्रजीतील ओ O हे अक्षर उच्चारताना आपण आपले ओठ O हाच आकार दर्शवितात. लाम म्हणजे केसांची वक्राकार बट. उर्दू भाषेत लामचे अक्षर म्हणून ल j सारखा लिहितात. कारण केसांची बट अशीच वक्राकार असते. उर्दूमधील ल आणि इंग्रजीतील ल सारखेच आहेत, पण उर्दू उजवीकडून डावीकडे जात असल्याने त्यांचा ल इंग्रजीतील एलच्या उलट्या दिशेने, म्हणजे जे सारखा लिहितात, इतकेच.

२) साडेसातशे वर्षांपूर्वी ज्ञानेश्वरांनी ॐ स्वरूपी गणेशाचे यथार्थ वर्णन केले आहे. अकार चरणयुगुल, उकार..उदर, मकार

महामस्तक। हे तिन्ही एकवटले। बैठ्या गणेशमूर्तीची मनाशी आठवण केली तर त्याचे दोन पाय अ अक्षरासारखे, उदर उ सारखे आणि मस्तक म सारखे असून हे तिन्ही एकत्र घेतले (आणि काटकोनात फिरवले तर) अ + उ + म = ॐ हे अक्षर तयार होते.

**३) वेदांतील ऋचांच्या खुणा :** अक्षरांच्या डोक्यावर वर जाणारी उभी रेष स्वरित आणि किंवा पायाखालची आडवी रेष ही अनुदात्त उच्चारांची सूचक असते. जेथे खूण नसेल, तेथील वर्ण उदात्त असतो. उदा. :

**ॐ यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।**

**तेहनाकं महिमानः सचंतयत्र पूर्वेसाध्याः संतिदेवाः ।।**

रेष वर जाते तो वर्ण वर उचलावयाचा आणि अक्षराखालची रेष ही वर्णाला खाली आणावयाचे आहे, असे सांगते. लिपी अशी सहज समजणाऱ्या चिन्हांमधून निर्माण होत असते. खरी गंमत तर पुढेच आहे. अनुस्वाराचा उच्चार वेदांतील लिपीत लिहितांना तेथे तर प्रत्यक्ष नाकाचे चित्र चिन्ह म्हणून काढले जाते. प्रख्यात व्यंग्यचित्रकार आर. के. लक्ष्मण फक्त चष्मा दाखवून महात्मा गांधीचा आणि नांक काढून पंतप्रधान इंदिरा गांधीचा भास निर्माण करीत असत, हे सर्वांना आठवेल.

४) यजुर्वेदाच्या ऋचा म्हणताना उजव्या हाताच्या आणि बोटांच्या काही हालचाली केल्या जातात. त्या वर, खाली, उजवीकडे, डावीकडे, कधी बोट मिटून तर कधी उघडून अशा केल्या जातात. त्या सर्व हालचालींमध्ये एक निश्चित असा अर्थ आणि सूचकता आहे. त्या हालचालींची चित्रे काढली, तर काही अक्षरांशी त्यांचे साधर्म्य दिसते. लिपी उत्पन्न होण्याकरता या हालचाली आहेत. १९८१ मध्ये एक इंग्रजी चित्रपट आला होता. आता त्याचे नाव आठवत नाही. पण त्यात वेदांच्या ऋचा आणि त्या उच्चारताना करावयाच्या हाताच्या हालचाली यांवर ८ मिनिटांचे एक दृश्य होते. परग्रहवासीयांना या स्वरांतून आणि हालचालींतून आवाहन केले जाते, असे त्यात सुचवले होते. एक प्रकारे आर. टी. ओ.ची रस्त्यावरील दिशानिर्देशक चिन्हे ही एक विशिष्ट अशी लिपीच आहे.

**५) साहित्यशास्त्र आणि नृत्य :** आपल्याकडे हास्य, अद्भुत, वीर, रौद्र, बीभत्स, करुण, शांत, शृंगार इत्यादी ९ रस सांगितले आहेत. कुशल नर्तक हे सर्व रस त्यांच्या मुद्रेवरती दाखवू शकतात.

**६) गायन :** गात असताना गायकाच्या चेहऱ्यावर आणि एकूणच शरीराच्या काही स्वाभाविक हालचाली होतात. कंठातून उत्पन्न होणाऱ्या स्वरांना पूरक अशी ही




बॉडी लँग्वेज असते. पं. भीमसेन जोशींना गाताना ज्यांनी प्रत्यक्ष बघितले असेल, त्यांना हे पटेल.

७) दोन मूक व कर्णबधिर व्यक्ती एकमेकांशी फक्त चेहऱ्यावरील भाव आणि हाताच्या बोटांच्या हालचाली यातून गरजेपुरतेच नव्हे, तर एखाद्या बोलक्या व्यक्तीप्रमाणे छान गप्पा मारताना दिसतात. त्यांच्या या अनाहत संभाषणांचा अर्थ लावू गेले, तर त्या हालचालींतून काही अक्षरांच्या लिपी चिन्हांचा उगम सापडतो.

८) असेच सर्वांनी अनुभवलेले एक उदाहरण म्हणजे, लग्नाच्या हॉलमधील गर्दीत आणि कोलाहलात दूर अंतरावरून दोन व्यक्ती एकमेकांना खुणांच्या माध्यमाद्वारे काही सांगतात आणि पहिल्याला काय म्हणावयाचे आहे ते दुसऱ्याला नेमके समजते. या अशा खुणांतून काही अक्षरे उद्भवली आहेत. उदा.- प्रश्नार्थक चिन्ह आणि त्याकरता केलेली हाताची मुद्रा.

९) चीनमध्ये चित्रलिपी आहे. त्यांची अक्षरे म्हणजे छोटी-छोटी चिन्हे. अनेक चित्राक्षरांपासून बनलेली ही अतिशय अवघड लिपी आहे. इतक्या संख्येने अक्षरे कोणत्याच लिपीमध्ये नाहीत.

१०) उर्दूचा अपवाद सोडला तर जास्तीत जास्त लिपी या डावीकडून उजवीकडे लिहिल्या जातात. असे का? कारण जगात डावखोऱ्यांपेक्षा उजव्या हातांनी लिहिणारे अधीक आहेत. स्वाभाविकपणे बहुतेक लिपी या डावीकडून उजवीकडे लिहिल्या जातात.

११) मेंदूचा एक आजार आहे. तो ज्याला झाला, तो मराठीतील ३ लिहावयाचे तर ६ लिहितो आणि इंग्रजी b लिहावे तर d लिहितो. हा आजार होण्याची शक्यता डावखोऱ्या लोकांना अधिक असते.

१२) नासा- नॅशनल एरोनॉटिक्स स्पेस एजन्सीने अवकाशात पृथ्वीसंबंधी काही माहिती सांकेतिक खुणांत लिहून पाठवली आहे. भविष्यात कोणा परग्रहनिवासींच्या हाती ही माहिती लागेल आणि त्यांना या खुणांद्वारा आपल्यासंबंधी सर्व माहिती मिळावी, ही अपेक्षा आहे. ही लिपी निर्माण करताना त्यांनी काही विशिष्ट खुणा निर्माण केल्या व माहिती लिहिली. एखाद्या प्रगत सृष्टीतील, निराळ्याच संस्कृतीतील, आपल्या कल्पनेपलीकडील तंत्रज्ञानात वावरणारे, निराळे आचार-विचार, भावभावना आणि क्वचित आपल्या पंचज्ञानेंद्रियापलीकडील संवेदना (शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध यापेक्षा निराळ्या जाणिवा) असलेले जीव तेथे आले, तर त्यांना हा अर्थ नक्की उलगडेल. ही विशिष्ट लिपी तयार करताना अनेक शक्यतांचा विचार करून, काही मूलभूत समान वैशिष्ट्ये गृहीत आहेत.

**शेवटी काही उदाहरणे पाहू.**

१) लिपी मानवी व्यवहारातून आपोआप कशी निर्माण होते याचे एक गमतीदार उदाहरण आहे. माझा भाचा फार लहान होता. इतका लहान की, त्याला अक्षर-ओळख, संख्याओळख इत्यादी झाली नव्हती. त्याच्या ३ चाकी सायकलला किती चाके आहेत, हे विचारल्यावर तो गोंधळला; पण लगेच त्याने जमिनीवर मातीत ३ ठिपके काढून चाकांची संख्या दर्शविली.

२) लहान संख्या सांगताना- उदा. १,२,३ पर्यंत दर्शविताना- आपण एक किंवा तितकी बोटे दर्शवितो. रोमन लिपीत १ करता सरळ उभी रेघ, दोन करता दोन, तर ३ करता तीन रेघा दाखविल्या जातात.

३) विजय, व्हिक्टरी दर्शविताना साहाजिकच हातांची बोटे ज्या आकारात उंचावली जातात, तो आकार म्हणजे इंग्रजीतील V.

४) उर्दू भाषेत लाम म्हणजे केसांची वक्राकार बट. उर्दू लिपीमधील ल (लाम) हे अक्षर आणि इंग्रजीतील जे सारखे वक्राकार काढतात. इंग्रजीतील एल हे उर्दूतील लामसारखेच फक्त डावीकडून उजवीकडे दाखवतात.

५) गणितातील शून्याची देणगी भारतीयांनी जगाला दिली. मात्र शून्याचे देवनागरी, बंगाली, गुजराती, कन्नड, गुरुमुखी, तेलुगु, उडिया, तिबेटी, थायलंड आणि इंग्रजी या सर्व लिपी आणि भाषेतील चिन्ह गोलाकार असणे, यामागचे कारण तत्त्वज्ञानात सापडते. प्रत्यक्ष असणे आणि असूनही नसणे, तदेजति-तन्नेजति-तद्दूरे तदवन्तिके। ही ईशावास्यासातील ब्रह्मांडविषयक कल्पना कमी-जास्त फरकाने इतर सर्वच संस्कृतींच्या तत्त्वज्ञानात आढळते आणि ब्रह्मांडाचा आकार गोलाकार म्हणून शून्याचे चिन्ह गोलच असणे स्वाभाविकच म्हणावे लागेल.

६) मराठी लिहिणे शिकताना आपण ग - गजाननाचा असे शिकतो. ग हे अक्षर गजाच्या म्हणजे हत्तीच्या सोंडेसारखे असते.

७) सर्वांत शेवटी या विषयाच्या समर्थनार्थ सर्वांच्या परिचयाचे एक गमतीदार उदाहरण येथे देतो. सार्वजनिक ठिकाणी स्त्री-पुरुषांच्या करता जी वेगळी व्यवस्था असते तेथे तर सरळ-सरळ स्त्री आणि पुरुष अशीच चित्रे दाखविली जातात.

अशी अनेक उदाहरणे दाखवता येतील. वरील उदाहरणांवरून हे सुचवावयाचे आहे की- लिपी आणि चिन्ह निर्माण होण्याकरता मानवी शरीर, त्याचे मूळ विकार, भावभावना, संवेदना, विचार व्यक्त करताना नैसर्गिकपणे होणाऱ्या शारीरिक हालचाली हे सर्व मुद्दे महत्त्वाचे आहेत. कालांतराने व्यवहाराच्या सोईकरिता लिपीतील अक्षरांत अनेक बदल झाले असले, तरी सर्वांच्या मुळाशी मानवी शरीर आहे.



# ये रे ये रे पैसा ...
## भाग – २

सौ. वैशाली वर्णेकर
मो. : ९८२२३४३००२


संपत्ती हा कोणत्याही मानवी संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे. अगदी सहजपणे आपले आयुष्य सुंदर रीतीने जगण्यासाठी पैसा आवश्यक असतोच. लक्ष्मीशी आपला तसा संबंध हा विचित्रच असतो. संपत्तीचा हव्यास धरून हपापलेले आयुष्य जगणारे असोत किंवा त्याचा त्याग करणारे तिरक्त असोत; पैशांचे खरे महत्त्व कुणालाच समजलेले नसते.

कुणी लक्ष्मीची पूजा करून रशीब फळण्याची वाट पाहतो, तर कुणी जीवनाला कर्मयज्ञाचे रूप देत धनसंपत्तीच्या मागे लागतो. कुणाच्या घरी लक्ष्मीचा वास, तर कुणाला जेवणही महाग. याचाच अर्थ पैशाला कुणीच समजून घेण्याचा प्रयत्न करत नाही. 'ठेवीले अनंते तैसेचि रहावे' या उक्तीप्रमाणे आपली मानमिकता ही समृद्धीच्या विद्धच असते. त्यागाचा जयघोष करत भोगाला नाकारणे आपल्याला आवडायला लागले आहे. यामुळे पैसा आणि समृद्धीमागच्या कार्यकारणभावाचा ऊहापोह करण्याच्या भानगडीत सहसा कुणी पडतच नाही. फक्त पैशांचा पाऊस, पैशांचे झाड अशा कल्पना मात्र आपण अजाणतेपणे वापरत असतो. त्यामुळे पैसा ही शक्ती काही तरी भयंकर आहे, असे आपल्या मनात रुजत गेले आहे.

जीवनात पैसा हे सर्वस्व नाही, हे वाक्य खरं तर खूप छान आहे. पण मित्रांनो, ते पूर्ण सत्य नाहीये. कारण आपण काहीही जरी म्हटलं तरी पैशांचा जोर आपल्या प्रत्येकालाच माहीत असतो.

कारण पैसा हे केवळ निर्जीव चलन नसून एक चैतन्यमय ऊर्जा असते. या ऊर्जेला भौतिक बाबींबरोबरच आध्यात्मिक अधिष्ठानही आहे. मानसिक, सामाजिक, वैयक्तीक पातळीवर याचे महत्त्वही वेगळेच आहे.

पैसा कमवण्यापेक्षा कमवल्यानंतर त्याचा योग्य त्या प्रकारे उपयोग करणे महत्त्वाचे असते. कारण पैशांविषयीची नकारात्मक भावना आपल्या मनात रुजल्याने एक वेगळाच आकस मनात तयार झालेला असतो. यामुळे कमाई



चांगली असली, तरी मनातील अपराधी भाव आपल्याला अस्वस्थ करत राहतात. 'पिंडी ते ब्रह्मांडी' या उक्तीनुसार ही नकारात्मक ऊर्जा आपल्या अगदी अंतमर्नापर्यंत जाऊन ठेपते आणि मग याचे विपरीत परिणाम आपल्यालाच भोगावे लागतात. मग आपण भविष्याची तरतूदही नीट करू शकत नाही. खरं म्हणाल तर मित्रांनो, चांगल्या रीतीनी कमाई करणं, हे काही पाप नाही. चांगली कमाई = संपन्न आयुष्य हेच आपण लक्षात घ्यायला हवं. या सकारात्मक विचारांनी आपलं अंतर्मन ऊर्जेनी भरून जातं आणि याचे उत्तम परिणाम दिसायला लागतात. आपलं संपूर्ण जीवन आणि पर्यायाने आपल्या कुटुंबाचं जीवन यामुळे बदलून जाईल.

### समृद्धीचं पहिलं पाऊल

मला श्रीमंत व्हायचंय असं प्रत्येक जणच म्हणत असतो. पण नुसतं म्हणून काही उपयोग नाही. आपण त्या दृष्टीनी काही तयारी करत आहोत का, याचाही विचार करायला हवा.

१) इच्छा : आपली खरीच इच्छा आहे का?

२) अशा : स्वतःवरचा आत्मविश्वास आणि स्वतःच्या कामावर पूर्णपणे श्रद्धा हवी.

३) स्वयंसूचना : आपल्याला जे साध्य करायचे आहे, त्यासाठी स्वतःला सूचना देऊन काम करायचे आहे. आज केले, उद्या कंटाळा– याला अर्थ नाही.

४) विशेष ज्ञान : जे करायचे आहे, जो व्यवसाय करायचा आहे, त्या–बाबतचे विशेष ज्ञान आपण मिळवले आहे का ?

५) स्वप्न : उत्तम स्वप्न पाहणे हेही गरजेचे आहे. स्वप्न पाहिले नाहीत, तर काही मनोकामना राहणारच नाही. स्वप्ने पाहा आणि ती सत्यात आणण्याचा प्रयत्न करा.

६) कल्पना : आपण जो व्यवसाय करायचा ठरवला आहे, त्यात आपण विजयी झालो आहोत याची कल्पना करा आणि कामाला लागा. उत्साह येईल.

७) निर्णय : आर्थिक निर्णय हृदयाने न घेता मेंदूने घ्या. योग्य ठरतील.

८) चिकाटी : सुरुवातीला कदाचित पराभव स्वीकारावा लागेल, हार मानावी लागेल; पण तरीही निराश


होऊ नका. चिकाटी ठेवा. नक्कीच यशस्वी व्हाल.

९) निर्भय राहा : कशाचीही भीती बाळगू नका. जास्तीत जास्त काय होईल याचा विचार आधीच करून ठेवा, म्हणजे दडपण येणार नाही.

१०) बचत करा : शक्य तेवढे पैसे- मिळकतीच्या १० टक्के तरी बचत करा. तुम्हाला पुढे उपयोगी पडतील.

११) चुका : - चुका जरूर करा, पण परत परत नको. एका चुकीतून शिकायला हवं. पहिली चूक सुधारून पुढे जायला हवे. शक्यतो दुसऱ्याच्या चुकीतून आपण शिकायला हवं.

१२) खर्चाचा क्रम : - खर्चाचा क्रम



ठरवा. जो खर्च अगदी आवश्यक आहे, तोच आधी करा.

१३) मन प्रसन्न ठेवा : मन सतत प्रसन्न ठेवा. पैसा, आरोग्य, नाती, प्रेम, आनंद व चारित्र्य याने संतुलित जीवन जगता येईल.

१४) जग गेलं खड्ड्यात : - कोण काय म्हणतंय याचा विचार करू नका. स्वत:ला काय वाटतं, त्याचा विचार करा.

१५) अडथळा : माझ्या आयुष्यात सगळ्यात मोठा अडथळा मीच आणि उत्तरही मीच, हे लक्षात ठेवा.


१९) स्थिर राहा : तुमचं ध्येय नक्की ठरवून घ्या. सतत बदलू नका. कारण लक्ष्मीही चंचल आहे.

मित्रांनो, ही सगळी पावलं उचलायची ठरवा. आर्थिक शांतीबरोबरच मन:शांती पण नक्की मिळेल.

# आई

विमल अंतुरकर,
दादर

गुरू पौर्णिमा झाली आणि आई, तुझी आकर्षाने आठवण झाली. आई,



तुझ्या आठवणीने मन बैचेन होते. एक दिवस असा जात नाही की, तुझी आठवण येत नाही. 'आई तुझी अठवण येते' हे गाणे पदोपदी आठवून मन थोडा वेळ बेचैन होते. खरोखर अक्षरे फक्त दोनच, पण त्यात केवढा अर्थ भरला आहे! 'एक अक्षरा अर्थ नसे रे, अनेक मिळूनी अर्थ कळे।' पण आई तुझ्या नुसत्या 'आ'मध्ये केवढा अर्थ भरला आहे. आ-आकाश, अथांग असा सागर- त्याला अंत नाही. श्री. सावरकरांनी देखील या अथांग सागराला विनंती केली, 'तू माझ्या मातृभूमीला वचन दिले आहे, ते तू पाळ. तू म्हणाला होतास की, तुझ्या पाठीवरून तू मला नक्की परत घेऊन येईन. माझ्या मातृभूमीला दिलेले वचन लक्षात ठेव.'

आई, तुझी माया अलोट आहे. पाडसाला घरी यावयास उशीर झाला, तर तुझ्या जिवाची घालमेल होते. तुझे मन बेचैन होते. तुझ्या मायेची बरोबरी कोण करणार? वाणीची अमोघता व वागण्याची प्रेमळता अशा संस्कृतीची तू आई, तुझ्याबद्दल काय लिहावे, सांगावे? माझी लेखणीच कमी पडते. कितीही संकटे येवोत, त्यांना न डगमगणारी तू... तुझ्या शब्दातच मोठी जादू आहे. इमकी शक्तिमान, इतके तुझ्यात असणारे मनोधैर्य ही तुला मिळालेली दैवी देणगीच होय. तुला अबला कोण म्हणणार? गेले ते दिन गेले.

आधुनिक काळात तू मोठी झेप घेत आहेस. नावलौकिक मिळवत आहेस. मोठी-मोठी पदे तू भूषवीत आहेस. तुझ्या नेत्रांतून ओघळणारे आनंदाश्रू मनाला केवढे मनोधैर्य देतात! तुझ्या अंगी असणारे चांगुलपणाचे गुण हे तुझे वैभवच. त्याला तोड नाही. म्हणूनच म्हटले आहे- स्वामी तिन्ही जगाचा, आई विना भिकारी! तुझ्यात असणाऱ्या सर्व गुणांमुळे तू 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी ही बोली सिद्ध करून दाखविली आहेस.

अनंत काळापासून स्त्रीचे श्रेष्ठत्व सिद्ध झाले आहे. दैत्यांचा नाश शेवटी स्त्रीच्याच हातून झाला आहे. कोणत्याही पुरुषामागे स्त्रीचा हात असतो. निरनिराळी असंख्य पदे मिळवून तुझ्यातले सामर्थ्य तू सिद्ध केलेस. पंतप्रधानपद मिळवून त्या क्षेत्रातही देशबांधव-भगिनी यांचा सन्मान करणारी माता म्हणून तुझा गौरव होत आहे. म्हणूनच तर तुला अनंत काळाची माता म्हणून संबोधले आहे. तुझा गौरव होत आहे. आई, तुला प्रणाम!

# प्रो. दत्तोपंत पोतदार यांचे संघाच्या द्वितीय संमेलनसमयी झालेले अध्यक्षीय भाषण

श्री. बापूसाहेब भाटवडेकर व मित्रहो,

आपल्या कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या द्वितीय संमेलनाचे अध्यक्षस्थान मला देऊन आपण माझा सन्मान केलात, हे जरी खरे असले तरी हे स्थान स्वीकारल्याने एक मोठी जबाबदारी मजवर येऊन पडली आहे, हे मी पक्के जाणतो. ही जबाबदारी पार पाडण्याची माझी एकट्याची हिंमत नाही. केवळ आपल्या सर्वांच्या प्रेमळ सहानुभूतीवरच मी अवलंबून आहे.

आपला हा संघ स्थापण्याचे ज्या वेळी घाटत होते त्या वेळी प्रास्ताविक चर्चेला एकदा मी हजर होतो. आपले संघाध्यक्ष रा. ब. पाध्ये यांचे घरी संघाचे उद्देश लिहून काढण्याचे काम चालू होते आणि जसे आज तसे त्याही वेळी आपणास संकुचितपणापासून सावध राहण्याविषयी सुचविणारे आक्षेपक होतेच. आता मजविषयी म्हणाल तर- मी निष्कारण भेदाभेद, फळ्या, तट, भिंती यांच्याविरुद्ध आहे. सर्व मनुष्यजातच काय, परंतु सर्व विश्वातील प्राणिमात्र यांच्या ठिकाणी सुद्धा एकच आत्मा आहे आणि म्हणून 'हे विश्वचि माझे घर।' ऐसी मती जयाची स्थिर। किंबहुना हे चराचर। आपण झाला।' अशा प्रकारचा बहुमोल उपदेश ज्ञानेश्वरप्रभृति संतांनी आम्हांस वारंवार केला आहे. अशी उदार शिकवण अंगी मुरलेला कोणताही महाराष्ट्रीय कसल्याही संकुचित वृत्तींना थारा देईल, हे संभवत नाही. रवींद्रनाथ टागोर यांनी आपल्या सुप्रसिद्ध मातृगीतात 'ज्या अनेक भेदाच्या भिंती माझ्या नजरेच्या आड येत आहेत, त्या पाडून टाकून परमेश्वरा! भेदरहित अशा निर्भेळ आणि स्वतंत्र स्थितीत माझा देश जाऊ दे' अशी परमेश्वराजवळ प्रार्थना केली आहे. माझे मित्र कवी यशवंत हेही इतर थोर कविजनांप्रमाणे आपल्या वृत्तिभेदाच्या पैल आड येणारे आहेत. तथापि, या जगाच्या 'बन्दीशाळेची' जखडबंदी त्यांनी उत्तम तऱ्हेने आकळली आहे. जगांतील वस्तुस्थिती याप्रमाणे डोळ्यांआड करता येत नाही. खरंच कल्पनेने जरी आपण उंच स्वर्गापर्यंत विहरलो, तरी ते कल्पनेचे विमान पृथ्वीवर कोठे तरी मैदानावरच उतरविले पाहिजे आणि अंतराळात असताना मोहरीएवढे दिसणारे पर्वत जमिनीवर आल्यावर आपले प्रचंड स्वरूप प्रगट केल्याशिवाय राहणार नाहीत. तात्पर्य, सर्व माणसे एक हे जरी खरे, तरी समर्थांनी म्हटल्याप्रमाणे भेदही खरे. 'भेद ईश्वर करूनि गेला। तो तुमचे याचे व वचने मोडिला' असे समर्थांनी ठासून सांगितले आहे. येणेप्रमाणे विचार केला असता, अप्रिय असले तरी जगात भेद आहेत आणि ते आहेत तसेच घेऊन चालले पाहिजे, हे कोणाही सुज्ञ माणसास सहज पटेल. असलेले भेद मुखपर्यवसायी कसे करता येतील, हे पाहणे आणि त्यासाठी प्रयत्न करणे हे आपले काम आहे. हिंदुस्थानामध्ये विशेषत: हिंदू लोकांत आज कित्येक शतके जातिभेद अस्तित्वात आहेत. हे जातिभेद मोडू म्हटल्याने एकाएकी मोडत नाहीत; ते आनुवंशिक आहेत; ते जवळजवळ सनातन असल्याविषयी बहुजनांची समजूत आहे. आज हजार वर्षांत लोकांच्या आचार-विचारांची ठेवण बहुश: त्यांना अनुसरून पडली आहे. अशा स्थितीत चार हजार नाही तरी चार प्रमुख जाती वा वर्ग हिंदूंत राहावेत, असे मला वाटते. किंबहुना, आनुवंशिक पद्धतीवरून समाजरचना प्रामुख्याने ठरविणे हेच सर्वांत सोईचे व परिणामी लाभदायक आहे. युरोपियन लोक अव्यवहार्य असल्या ऐक्याच्या कल्पनेत वाहून गेल्या कारणाने सांप्रत भांबावून गेले आहेत. बहुत वर्षांचा आपला अनुभव आपण एकाएकीच त्याज्य ठरवून हुरळून जाण्याचे कारण नाही. असो. ब्राह्मणांपुरतेच पाहिले तरी सर्व ब्राह्मण समाजांत ऐक्य घडवून त्यांचा एक संघ बनवावा, ही कल्पना पुष्कळांस पटल्याचे दिसते; परंतु त्यातील कऱ्हाडे, कोकणस्थ, देशस्थ वगैरे जे पोटभेद विद्यमान आहेत ते मोडून टाकावेत- निदान असतील त्यांना उजळा देऊ नये म्हणजे ते दाबून टाकावेत- असे पुष्कळ विचारी लोकांचे म्हणणे आहे. नुसते काणाडोळा केल्याने असले भेद नाहीसे होत नाहीत. लहान-लहान, बारीक-बारीक पोटभेद हेही कोणाचे मते विशिष्ट गुणसंवर्धनाचे दृष्टीने अवश्य रक्षणीय आहेत. ब्राह्मणी गुण, कोकणस्थी किंवा कऱ्हाडी विशिष्ट गुण असे भेद यथार्थ आहेत असे जरी कोणी दाखवू शकला नाही, तरी सबंध ब्राह्मणांचे एकीकरण केल्यापासून सरासरी ब्राह्मण जातीचे सामर्थ्यच वाढेल, असे मला वाटते. काही विशिष्ट गुण कोणातून गेले तरी हे वैशिष्ट्य लोप विशेष घातक होणार नाही, असे वाटते. अशी याबद्दल मतमतांतरे आहेत. तेव्हा माझ्या मते एकीकडून अनावश्यक भेदांची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न करावा आणि त्याच वेळी दुसरीकडून

असलेल्या भेदांना चांगुलपणाचे आणि सत्पर्यवसायी वळण लावावे. पोटजातींचे संघ स्थापन करण्याची कल्पना वरीलपैकी दुसऱ्या प्रकारात येते. ब्राह्मण ज्ञातीचा संघ घेतला व ब्राह्मणसभा म्हटल्या तरीसुद्धा 'दक्षिणी ब्राह्मण सभा' अशा प्रकारचा काही तरी भेद सोईसाठी आज तरी पत्करलेला आपण पाहतो. गुर्जर, मालवीय, दक्षिणी, कानडी- सर्व ब्राह्मण एक, त्यांचा एक संघ व्हावा किंवा असावा; पण आज ती केवळ कल्पनाच आहे. आणि झाले तर दक्षिणी, गुर्जर, मालवीय असे संघ होतील व या सर्वांचे अखिल ब्राह्मण संघांत रूपांतर करावे लागेल, याहून दुसरी तोड नाही. करावयाचे असेल तर अखिल ब्राह्मण संघ करा, दक्षिणी ब्राह्मण सभा नको- असे म्हणणेही बरोबर होणार नाही. तोच न्याय आणखी पुढे नेऊन असे म्हणावे लागेल की कऱ्हाडे, कोकणस्थ, देशस्थ प्रभृति पोटजातीचे संघ आधी बनवून मग त्यांचे सकल दक्षिणी ब्राह्मण संघांत एकीकरण करावे लागेल, हीच संयोग संघटना (Federal) पद्धति आपणास अनुसरावी लागणार आणि ज्यापक्षी हे स्पष्ट दिसत आहे त्यापक्षी विद्यमान उपजातींची उपेक्षा करण्यापेक्षा त्यांस जातीत: संघटित करणे हेच श्रेयस्कर होईल. सोन्याची सुरी झाली म्हणून काही उरी घालू नये. काही एका सोईकरता भेद पत्करला म्हणजे तोच सर्वस्व समजून चालू नये. अशा विचारसरणीनेच पुण्यास ज्या वेळी कऱ्हाडे ब्राह्मण संघ स्थापन केला, त्या वेळी त्याची उद्देशपत्रिका काढण्यात आली, ती वाचून दाखवितो. ''सध्या अस्तित्वात असलेल्या जातिसंस्थांचा उपयोग सुटसुटीत जातिसंघ, समाज व देश यांच्या सेवेसाठी अधिक कार्यक्षम करण्यासाठी होण्यासारखा आहे असे वाटल्यावरून कऱ्हाडे-ब्राह्मण-पोटजातीचा एक संघ स्थापण्यात येत आहे.'' इत्यादी.

या उद्देश पत्रिकेवरून स्पष्ट होईल की- कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे यांचा उद्देश तरी सकल ब्राह्मण संघाची सेवा आणि सकल राष्ट्राची सेवा करण्याचा, म्हणजे एकी करण्याचाच आहे. सवता सुभा स्थापण्याचा नाही. दक्षिणी ब्राह्मण सभा, मुंबई आणि कऱ्हाडे संघ यांच्यामध्ये असावे तितके सौरस्य नसल्याचे ऐकून मला खेद झाला. संधी सापडेल त्या वेळेस 'दक्षिणी ब्राह्मण सभेचे' पुढारी यांच्याशी याबाबतीत वाटाघाट करण्याचा मी अवश्य प्रयत्न करीन. उदार आचारसरणी व विचारसरणी यांत मी कोणाच्या मागे राहीन, असे मला वाटत नाही. कदाचित पुढेही जाईन, असे असल्यामुळे मी या उदारपणाच्या भूमिकेशी कऱ्हाडे ब्राह्मण संघाचा सभासद राहणे अथवा कार्याध्यक्ष राहूनही पोटजातींतील विवाहास उत्तेजन देणे किंवा तसे विवाह घडवून आणणे या गोष्टीत मला विसंगत काहीच दिसत नाही.

पोटजाती हा भेद रूढ आहे. पोटजातीमध्येच विवाहही बहुश: रूढ आहे. विवाहामुळेच नात्यागोत्यांचे आप्तसंबंध रूढ होतात आणि हे असे आदराचे संबंध साहजिकच अधिक स्वार्थत्यागाला प्रवृत्त करतात. जेवढा स्वस्त किंवा स्वार्थत्याग कोणी आपल्या मुलांबाळांकरता किंवा आप्तेष्टांकरता करील, तेवढाच त्याग इतरांकरता त्याचे हातून सहसा होणार नाही. अर्थात् इतरांकरता कोणी एक टक्का सोसला, तर आपल्या आप्तेष्टांकरिता दहा टक्के घस सोसणारी मंडळी पुष्कळ भेटतील. तेव्हा आप्तपणाचा जो हा आपलेपणा, तो आप्तसमूहाच्या म्हणजेच पोटजाती संघांच्या आपत्ति-निवारणास, शिक्षणास व इतरत्र वृद्धीस आणि इतरांशी सहकारास अधिक संघटित केल्यास ते निःसंशय फायदेशीर होईल, असे मला वाटते.

'अन्न तारी, अन्न मारी' ही म्हण प्रसिद्ध आहे. अर्थात् अन्न खाणे' हे प्रकृतीला हितावह होईल अशा पद्धतीने खाल्ले पाहिजे. त्याचप्रमाणे पोटजातीचे संघटन हेही सकल राष्ट्रहिताला पोषक होईल अशाच धोरणाने चालविले पाहिजे. संकुचित भावनांची तीव्रता वाढविणे, दृष्टीला लघुत्व अधिक आणणे, लघु लघु संघानी एकमेकांचा द्वेष करणे अथवा भांडणे- असे अनिष्ट परिणाम पोटजाती संघांमुळे घडून येण्याचाही संभव आहे. परंतु पंतांनी विचारिले आहे, 'का न सदन बांधावे की त्यांत पुढे बिळे करिल घूस?' बोट कापेल म्हणून कोठे चाकू वापरू नये, असे म्हणता येत नाही. या न्यायाने 'सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृता:' अशीच मर्यादा श्रीकृष्णांनी भगवद्गीतेत सांगितली आहे. 'अति खाणे आणि मसणात जाणे', हेही उपयोगाचे नाही आणि 'खाईन तर तुपाशी, नाही तर उपाशी' हेही उपयोगाचे नाही. व्यवहारांत मध्यमार्गानेच चालावे लागते.

नुसत्या गोड शब्दांनी विशेष काही होणार नाही. आपण प्रत्यक्ष कृत्ये काय कराल, यावरच पुढील सर्व गोष्टी अवलंबून राहतील. म्हणून शब्दापेक्षा कृतीनीच आपल्या उदारपणाविषयी आपण सर्वांची खात्री पटवून दिली, तर मग आपणास कोणाचेही भय बाळगण्याचे कारण नाही. पुष्कळ लोक या संघस्थापनेला विरुद्ध आहेत, हे पाहून मला तरी एक प्रकारचा आनंद वाटला. सभासद न होतानाही अशा संमेलनाला पाहुणे म्हणून हजर राहून आम्हाला साह्य व उपदेश वारंवार करून आमचे हातून काहीही अनिष्ट वर्तन घडत असले तरी त्या वेळेस आम्हास सावध करून आम्हाला सन्मार्गावर ठेवण्याविषयी सतत प्रयत्न करण्यात आमचे मित्र कसूर करणार नाहीत अशी मला आशा आहे.

**-कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई**


# मेंदूलाही विश्रांती हवी

श्री. आशिष महाजन
मो. :९१११२२१११९

कोणतीही गोष्ट चालू व्हायला किंवा चालू राहायला ताण ही सगळ्यात महत्त्वाची गोष्ट आहे. गाडीची दोन चाकं समान गतीत चालू राहायला साखळीचा योग्य ताण हवाच असतो. हो... हो, ताण ही आवश्यक गोष्ट आहे आणि तो आपल्यावर कायम असतोच. ताणामुळेच आपण कार्यरत राहतो. पण ताण ह्या शब्दाची नकारार्थी किंवा ऋण बाजूच आपल्याला माहीत आहे. त्यामुळे ताणाचीही माणसाला कार्यप्रवण करणारी दुसरी एक बाजू आहे, हे आपल्याला माहीतच नाही. आपण त्याचे जरा स्पष्टीकरण करू.

ताण म्हणजे काय? कोणत्याही प्रकारची कृती करण्यासाठी आपण स्वतःवर घातलेले अदृश्य बंधन, त्या कृतींसंबंधी होणारे होकारार्थी विचार वगैरे. (तसंही मानवी मेंदूत ४७ सेकंदांत २५० विचार उत्पन्न होतच असतात.) उदा.- आपल्या अपेक्षा, गरजा, जबाबदारी, अपेक्षित कार्य न झाल्याने येणारे विचार इ. इ. अशा सगळ्या विचारांनी, कृतींनी आपण स्वतः बंधनात असतो. त्यामुळे आपल्या उत्साहाला-हौसेला जो चाप बसतो, त्याला ताण म्हणतात. पण तो नसला तर माणूस आपल्या जबाबदाऱ्या, गरजा, आपले ध्येय इ. साध्य करण्यासाठी जागेवरून उठणारच नाही. त्यामुळे ताण हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. तो आपल्यासोबत असतोच आणि तो चांगलाही असतो. पण सावधान! कारण या आपल्याला क्रियाशील करणाऱ्या सहायकाला आपण आपल्याबरोबर सतत राहण्याची संधी दिली, तर मात्र तो आपल्यावर उलटतो. 'अतिपरिचयादवज्ञा' किंवा चांगल्याचा अतिरेकही वाईट, असं मोठे लोक म्हणून गेलेत ते काही खोटं नाही.

अशा ह्या सतत येणाऱ्या ताणात राहिलो, तर त्याचं रूपांतर त्याहून उग्र स्वरूपात होतं. त्यालाच तणाव म्हणतात. तणावामुळे आपल्यात असलेली कार्यक्षमता, एकाग्रता, मनःशांती पार



संपून जाते. चिडचिड, थकवा, नैराश्य वगैरेंसह शारीरिक व्याधींनाही आपसूक आमंत्रण मिळत जातं. (सामान्यतः ७५ टक्के आजार तणावामुळे उत्पन्न होतात, असं WHO ने म्हटलं आहे.) तणावात नेहमी गुणाकारानेच वाढ होत जाते आणि त्यायोगे मनस्ताप, खर्च, दगदग इ. सगळं आलंच. मुलांना अभ्यासामुळे, तरुणांना करिअरमुळे, नोकरी-आर्थिक प्रश्न वगैरेंमुळे, प्रौढांना कमी होत जाणारी शक्ती, पुढच्या पिढीची अस्थिरता, कधी तरी एकटेपणा, लैंगिक क्षमतांमध्ये येणारी उणीव आणि त्यामुळे कमीपणाची भावना, अपुरेपणाचा गंड, वृद्धांना एकटेपणा, क्षीणता वगैरे गोष्टींच्या अतिरिक्त ताणाने प्रचंड तणाव येतो. सोबतच लिंग, वय, स्वभाव, नाती, संबंध, आर्थिक प्रश्न वगैरे अनेक कारणांनी होणारी भांडणं, येणारं वैफल्य, अपयश, होणारा तोटा, अपेक्षाभंग, प्रेमभंग, अनैतिकता इ. तणावाला काही कमी कारणं नाहीत. वाचूनही नकोसं होईल. गर्भावस्थेत आईची शक्ती, अन्न, ज्ञान जसं पोटातल्या जीवाला मिळतं, तसा तिचा ताणही तो जीव अनुभवत असतो; इतका मनुष्याला ताणाचा अनुभव असतो. काही मुळी मर्यादाच नाही तणाव ह्या शब्दाला! त्यामुळे ती एक 'समस्या' आहे, हेही लक्षात येत नाही आणि बऱ्याचदा उपायसुद्धा सापडत नाहीत. म्हणूनच 'सावधान' असं म्हटलं.

पण ताणाकडून तणावाकडे प्रवास होतो तरी कसा? तर, प्रत्यक्ष कृती जरी आपले शरीर करीत असले, तरी ती करण्याचा विचार आपला मेंदू करतो. माणूस काम करत असो किंवा नसो, जागा असो किंवा झोपलेला असो; त्याचा मेंदू मात्र सतत, अविरत चालू असतो. एकाच वेळी अनेक पातळ्यांवर तो काम करतो. डोळे, कान इ. ज्ञानेंद्रियांकडून सतत

मिळणाऱ्या माहितीची नोंद, पूर्वीच्या माहितीशी तिचा ताळमेळ, त्यानुसार शरीराला-मनाला विविध आदेश देणं वगैरे वगैरे... दररोज, दर क्षणाला, न चुकता... मेंदू हे सगळं काही करतो!

पण हो, 'न थकता' हे सगळं सांभाळणं मात्र त्याला शक्य नसतं. जशी कोणाची ओझं उचलण्याची शक्ती कमी असते, तर कोणाची जास्त असते; तशी प्रत्येकाच्या मेंदूचीही काम करण्याची शक्ती कमी-जास्त असते. त्या क्षमतेला मर्यादा आहेत. 'छे: डोकं चालत नाही!' अशा शब्दांत आपण व्यक्तही करतो. ती मेंदूच्या थकव्याची एक सूक्ष्म छटा आहे. थकवा वाढत गेला की आळशीपणा, विसराळूपणा, चिडचिडेपणा, असहनशीलता, न्यूनगंड, भयगंड, अहंगंड, नैराश्य, निद्रानाश, लक्ष न लागणे म्हणजे मन एकाग्र न होणे अशी विविध रूपं धारण करतो. तणावाचे हे अवतार सगळ्यांनाच परिचयाचे आहेत. इतकी अवस्था येईपर्यंत खरं तर कोणीही वाट पाहू नये; पण किमान हे त्रास होऊ लागल्यावर तरी लक्षात घ्यावंच... आता मात्र तुमच्या मेंदूला विश्रांती हवीच आहे.

आज मानवी मेंदूला (मनाला) केंद्रस्थानी ठेवून काम करणाऱ्या बऱ्याच सगळ्या उपचारपद्धती आहेत आणि त्या सल्ले-सूचना देणाऱ्या, तुमचा प्रत्यक्ष सहभाग अपेक्षिणाऱ्या आहेत. दमलेल्या मेंदूलाच काम करायला लावण्याने उपचार कसा होईल? कोणी सांगितलं म्हणून सगळा भार 'त्याच्या'वर सोपवून ताण जातील? 'आजपासून मी सकारात्मक विचार करणार, सगळं चांगलंच होणार' असं अगदी पक्कं मानता येतं आणि मानलं तर ताण जातील? त्यातून अचानक काही प्रतिकूल घडलं, तर तो धक्का सहन होईल? कोणत्याही अस्वस्थतेसाठी उठलं नि ध्यान लावलं- असं कसं होऊ शकतं? ध्यान ही योगातील एक उच्च अवस्था आहे, समाधीच्या जवळ जाणारी अवस्था आहे. ती सिद्ध व्हायला अगोदरच्या अवस्थांची पूर्ती अपेक्षित आहे. त्याकडेही आपण लक्ष देत नाही. ह्या आणि अशा अनेक 'चालणाऱ्या' पद्धतींनी दिशाभूल होते, दुसरं काही नाही. मानसिक समस्येवर उपाययोजना शोधताना सावधगिरी बाळगली पाहिजे ती ह्याच कारणाने.

शरीर थकल्यावर आपण काम थांबवतो, झोपतो आणि शरीराला विश्रांती देतो. जेवून, फळांचे रस पिऊन तत्काळ नवी ऊर्जा देतो. मेंदू तर सगळी शरीरयंत्रणा चालवतो; मग त्याला हे सगळं कोण आणि कसं देणार? कोणतंही काम, जबाबदारी नाही, अमकं काम अमक्या वेळेत व्हायला हवं इ. प्रकारची ताबेदारी नाही- हीच आरामाची साधी कल्पना आहे. मगाशी पाहिलेल्या सगळ्या प्रकारांमध्ये ज्याला आराम द्यायचा, त्या मनाला म्हणजे मेंदूलाच सूचना दिल्या, कामं सांगितली; तर त्याला आराम कुठून मिळणार? म्हणून मनाशी, बुद्धीशी, व्यक्तीच्या अस्तित्वाशी अनुसंधान साधून सेवा देऊ शकेल असा उपाय शोधायला हवा. ह्याचा विचार करताना 'सिद्धानुभूती'ची कल्पना सुचली.

मेंदूचा थकवा तर दूर व्हावाच, पण मेंदू अधिक कल्पकतेने कार्यरतही व्हावा असा कोणता उपाय असेल; ह्याविषयी संशोधन करताना असं लक्षात आलं की, मेंदूच्या अलौकिक आकलनशक्तीचा व ग्रहणशक्तीचा विचार करूनच पुरातन शब्दशास्त्र तयार झालं आहे. बोलताना निर्माण होणाऱ्या अर्थपूर्ण स्फोटातून मेंदू अर्थ ग्रहण करतो आणि त्याचं आयुष्यात योग्य ठिकाणी उपयोजन करतो. शब्दस्फोट मेंदूला कोणतीही आज्ञा देत नाही, सूचना करत नाही; तर तो फक्त स्वतःचा अर्थ त्याच्यापर्यंत पोहोचवतो.

'सिद्धानुभूती'- शब्दोच्चाराद्वारा केला जाणारा एक उपाय. वर्णांचा अर्थपूर्ण समूह म्हणजे शब्द. त्याचा उच्चार केल्यावर लहरींद्वारा जाणवणारा नाद हे त्याचं दुसरं रूप. शब्दाच्या ह्या दोन्ही रूपांचा उपयोग करून मेंदूवरील ताण घालवता येतो. माणसाचं वय, स्वभाव, प्रकृती, तत्त्व इत्यादींचा विचार करून हा उपचार केला जातो. कोणत्याही दोन व्यक्तींच्या ह्या सगळ्या गोष्टी आणि समस्या समान नसतात, त्यामुळे सर्वांना एकच ठरीव उपाय लागू होत नाही. (अर्थात काही मर्यादित व विशिष्ट परिणाम साध्य करण्याबाबतीत हा नियम नाही.) गर्भातील जीवापासून कोणत्याही वयातील व्यक्तीला ही उपायपद्धती उपयुक्त आहे.

ह्या उपायात कोणतीही सूचना दिली जात नाही, काहीही सराव करायला सांगितला जात नाही, कसलेही व कोणातीही अनुकरण करायचे नसल्याने मेंदू कोणत्याही व्यक्ती वा विचाराच्या प्रभावाखाली नसतो. त्यामुळे शब्दोपचार केला जात असताना मेंदूला आवश्यक ते शब्दच आपल्या अर्थांचं ग्रहण करवतात आणि त्याच्यावरचा ताण जातो; तो ताजातवाना, क्रियान्वित होतो.

एक तणाव नसेल तर काय-काय होतं? मन शांत राहतं, झोप नीट लागते, दिवसभर कामात मन लागतं, सकाळी ठरवलेली कामं संध्याकाळपर्यंत पूर्ण करण्यात आपण प्रयत्नशील राहतो. त्यामुळे दिवसाच्या शेवटी दमल्याचंही समाधानच मिळतं. मुलं नीट अभ्यास करतात; कारण त्यांचं लक्ष नीट लागतं, गृहपाठ दुप्पट वेळ न खाता संपतो, जेवण्याची इच्छा राहते, त्याची चव लागते. सगळं ठीक चालल्याने घरात सुसंवाद होतो. एकूणच तणाव नसला की, माणसाचं जगणं सोपं होऊन जातं.

म्हणून म्हटलं, मेंदूला विश्रांती हवी!

# सिंधुदुर्ग जिल्हा कऱ्हाडे ब्राह्मण संघ

## गुणगौरव समारंभ व वार्षिक सभा

दिनांक २३/६/१९ रोजी आर्यादुर्गा मंदिर सभागृह, कणकवली येथे दोन्ही समारंभ झाले.

सकाळी १० वाजत नोंदणी व चहा-नाश्ता झाल्यानंतर ११ वाजता कार्यक्रम सुरू झाला. अध्यक्ष श्री. प्रदीप जोशी व प्रमुख वक्ते श्री. इंद्रनील ठाकूर यांचे हस्ते दीपप्रज्वलन व झाशीची राणी प्रतिमापूजन झाले. कुमारी जावडेकर, काजरेकर व भाटवडेकर यांनी गणेशवंदना सादर केली. प्रास्ताविक श्री. सुधाकर देवस्थळी (खजिनदार) यांनी केले. इ. १० वी ८०% व इ. १२ वी ६५% गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा रोख रक्कम, पुष्प व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. श्री. अमित पाध्ये यांनी पार्श्वसंगीत दिलेल्या लघुचित्रपटास फिल्मफेअर पुरस्कार प्राप्त झाला. त्याबद्दल शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. श्री. इंद्रनील ठाकूर यांनी 'झाशीच्या राणीचा पराक्रम व तत्कालीन परिस्थिती' या विषयावर अभ्यासपूर्ण उद्‌बोधन केले. श्री. प्रदीप जोशी यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. श्री. राहुल जोशी (सहसचिव) यांनी सूत्रसंचालन केले. सौ. वैदेही मुंडले यांनी अभारप्रदर्शन केल्यानंतर कार्यक्रम समाप्त झाला. नंतर २ ते ३ या वेळेत सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला. भोजन व अन्य सर्व व्यवस्था करण्याकामी श्री. विनायक मुंडले (तालुकाध्यक्ष) व श्री. देवस्थळी (खजिनदार) यांनी परिश्रम घेतले.

**सचिव, श्री. वि. गो. उमर्ये**

## वार्षिक सर्वसाधारण सभा २०१८-१९

दुपारी ३ वाजता वार्षिक सर्वसाधारण सभेस सुरुवात झाली. अध्यक्ष श्री. प्रदीप जोशी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. दिवगंतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. मागील सभा सन १७-१८ चे इतिवृत्त वाचून मंजूर करण्यात आले. १८-१९ चा वार्षिक अहवाल व आयव्यय पत्रके मंजूर करण्यात आली. सन १९-२० चे अंदाजपत्रक वाचून मंजूर करण्यात आले. आयत्या वेळच्या विषयांमध्ये सभासदांनी विविध सूचना मांडल्या. त्यावर चर्चा होऊन नोंद घेण्यात आली. सचिव श्री. उमर्ये यांनी आभार मानल्यावर सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**सचिव, श्री. वि. गो. उमर्ये**

# कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली

### वर्षा सहल २०१९

डोंबिवली पश्चिम नगर कार्यकारिणीद्वारा संस्थेच्या सभासदांची वर्षा सहल विसावा रिसोर्ट सरळगाव, मुरबाड या ठिकाणी रविवार, दि. २८/०७/२०१९ रोजी आयोजित करण्यात आली. या वर्षा सहलीला एकूण ४१ सदस्य आले होते. पाऊस अतिशय पडल्यामुळे वर्षा सहल जाणार की नाही, असे अनेकांचे फोन श्री. अनिरुद्ध शेंबेकरांना यायला लागले. पण देवाच्या कृपेने शनिवारी पाऊस थांबला व रविवारी ठरल्याप्रमाणे आमची बस सम्राट हॉटेलच्या इथे आली. बस अर्धा तास उशिरा सुटली. चार ठिकाणी सभासदांना घेण्यासाठी बस थांबली व बरोबर ९.३० वा. आम्ही इच्छित स्थळी पोहोचलो.

नंतर प्रथम ठरल्याप्रमाणे मुगाचे वडे व उपमा हा सर्वांचा नाश्ता झाला. तद्नंतर रेन डान्स व स्विमिंग पुलाचा आनंदही उपस्थितांनी घेतला. दुपारी भोजनानंतर तीन-चार प्रकारचे खेळ घेतले. संगीत खुर्चीमध्ये मंडळाचे अध्यक्ष श्री. सुहास पंडित यांना पहिले बक्षीस मिळाले. तसेच हौजी, सामान्य ज्ञान यामध्येही अनेकांना बक्षिसे मिळाली. तिथल्या एका बाईने सर्व बायकांच्या हातावर सुंदर मेंदी काढली. तेथील सुंदर गुलाबाचे ताटवे व तेथील आवारात लिहिलेले सुविचार आम्ही आवर्जून पाहिले. संध्याकाळी सर्वांनी चहा-नाश्ता करून गमती-जमती करत परतीचा प्रवास सुरू झाला. रात्री ठीक ८.०० वा. घरी पोहोचलो.

असा आमच्या वर्षासहलीचा छान सुंदर प्रवास झाला. असाच उत्साह आपल्या वार्षिक हैदराबाद सहलीसाठी दाखवावा, असे सर्वांना आवाहन करण्यात आले.

**पद्मजा पु. पुरोहित**
डोंबिवली पश्चिम नगर कार्यकारिणी प्रमुख

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर यांचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर यांचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ रविवार, दि. ८ सप्टेंबर १९ रोजी लक्ष्मी मंगल कार्यालय येथे सकाळी ठीक १०.३० वाजता संपन्न झाला. समारंभाचे अध्यक्षस्थानी कुरुंदवाड शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. शरद पराडकर होते. पुरोहितांच्या आशीर्वादाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. उपस्थित सभासद व विद्यार्थ्यांचे स्वागत कार्यवाह धर्मराज पंडित यांनी केले. पाहुण्यांचा परिचय सौ. विनिता आंबेकर यानी करून दिला.

त्यानंतर आदर्श दाम्पत्य म्हणून डॉ. आरेन हर्डीकर व सौ. हर्डीकर, श्री. व सौ. टेंगशे, श्री. व सौ. पित्रे व देणगीदार श्री. व सौ. कार्किडे यांचा सत्कार करण्यात आला. या सर्वांचा परिचय व त्यांच्या कार्याबद्दलची माहिती सौ. विनिता आंबेकर यांनी दिली. यानंतर प्रमुख पाहुणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी शैक्षणिक संस्था चालविताना आलेले अनुभव, ते चालवीत असलेली निवासी शाळा याविषयी माहिती दिली. त्यांच्या या निवासी सैनिकी शाळेमध्ये २५०/३०० मुले वास्तव्यास असल्याचे सांगितले.

सदर समारंभास संघाचे ज्येष्ठ सभासद, माजी पदाधिकारी, इतर संचालक व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अनिरुद्ध जावडेकर यांनी आभार प्रदर्शन केले. समारंभास संघाचे अध्यक्ष आनंद खंडकर, उपाध्यक्ष शारदा लुकतुके, सहकार्यवाह अजित कारखानीस, संचालक मिलिंद पावनगडकर, रघुनाथ धुपकर, नितेश जोशी, रामचंद्र टोपकर आदी उपस्थित होते.

पसायदानाने या कार्यक्रमाची सांगता झाली.

**मिलिंद पावनगडकर,**
कोल्हापूर प्रतिनिधी

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर यांचा कोजागरी समारंभ

कोल्हापूर संघाचा कोजागरी समारंभ अतिशय उत्साहात आणि सभासदांच्या



प्रचंड उपस्थितीत संपन्न झाला. नितेश जोशी प्रस्तुत ओंकार नाद निर्मित गाण्यांचा कार्यक्रम सादर झाला. सुरुवातीस दुग्ध-पान, कार्यक्रमानंतर भोजन अशा क्रमाने कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रम सर्वांना अतिशय आवडला. उपस्थित सर्वांचे आभार, मानण्यात आले. या वेळी श्री. अरुण डोंगरेकाका यांचा देवल क्लबच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल व श्री. टोपकर साहेब यांचा मंगल धामच्या



treasurer पदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

**मिलींद पावनगडकर,**
कोल्हापूर, प्रतिनिधी

## चारोळ्या

### भावना

**मनातल्या शब्दरूपी भावना**
**कोऱ्या कागदांवर उतरतात**
**आजूबाजूच्या लोकांना उगीचच वाटते**
**मला देखील कविता करता येतात.**

### जात

**जा जा म्हणतो तरी ती नाही जात**
**लपवून ठेवली तरी लपून नाही राहत**
**नावासोबत चिकटून राहते जन्माला येताच**
**चितेवरही जळत नाही तिलाच म्हणतात जगात जात!**

श्रीपाद टेंबे : ९१५८० ८८०४२

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, बडोदे

रविवार, दि. ८-९-२०१९ रोजी कऱ्हाडे ब्राह्मण संघ, बडोदेतर्फे गुरू गौरवदिन साजरा करण्यात आला. सर्व-प्रथम वंदे मातरम्, नंतर प्रथेप्रमाणे अभिवचन मंत्रपठण करण्यात आले.

त्यानंतर अध्यक्ष श्री. नरेन्द्र ह. पानवलकर यांनी प्रसंगोचित भाषण केले.

आपल्या ज्ञातिबांधवांतून निवृत्त शिक्षक श्री. विजय यशवंत ताटके, सौ. निशा अ. खेर, श्रीमती रोहिणी खांडेकर यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, मिठाई व मानपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात





आला. निवृत्तिनंतर समाजऋण फेडीच्या भावनेने या तिघाही सन्माननीय शिक्षकांनी कोणताही मोबदला न घेता त्यांच्या विषयाचे ज्ञानदानकार्य अविरतपणे चालू ठेवले आहे. त्यांच्या या कृतीचा आम्हास गौरव वाटतो.

त्यानंतर दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर (डिस्टिंक्शन) अशा आठ यशस्वी विद्यार्थ्यांचा रोख पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला.

त्यानंतर नौदलातील निवृत्त अधिकारी श्री. विनायक अभ्यंकर, पुणे यांचे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवन-चरित्राबद्दल माहिती देणारे प्रेरक व्याख्यान झाले. श्री. अभ्यंकर यांच्या ओघवत्या शैलीने श्रोते मंत्रमुग्ध झाले.

त्यानंतर श्री. शशिकांत शर्मा यांचे वास्तुशास्त्र याविषयी मार्गदर्शनपर व्याख्यान झाले. उपस्थित श्रोत्यांनी त्यांना अनेक प्रश्न विचारले. श्री. शर्मा यांनी समर्पक उत्तरे देऊन त्यांचे समाधान केले.

कार्यक्रमाच्या शेवटी श्री. मधुकर पंडित यांनी आभार प्रदर्शन केले. त्यानंतर राष्ट्रगीत झाले आणि अल्पोपाहारानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम सुविहितपणे पार पाडण्यात श्रीमती मेधा करकरे, सौ. स्वाती बाकरे व सौ. जयश्री तांबे यांनी उत्तम साह्य केले.

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबईची एक अविस्मरणीय अनोखी श्रावण कोजागरी.....

रविवार : दि. १३ ऑक्टोबर २०१९ ची कोजागरीची सायंकाळ उजाडली आणि दादर पूर्वेला असलेलं प्राचार्य बी. एन. वैद्य सभागृह तुडुंब भरलं. जवळपास ४५० कऱ्हाडे ज्ञाति-बांधवांनी आपली उपस्थिती नोंदवली. कार्यक्रमाची सूत्रे सौ. प्रीती किरकिरे यांनी हाती घेऊन आपल्या नेहमीच्या सहजसुंदर प्रतिभेने सर्वांचं स्वागत करून गणेशपूजनाने कार्यक्रम वेळेत सुरू केला.

प्रमुख अतिथी आणि सत्कार-मूर्तींच्या उपस्थितीत, सत्कारमूर्तींपैकी सुप्रसिद्ध संगीतकार श्री. कमलेश भडकमकर आणि त्यांच्या साथीदारांनी वाद्यवृंदाच्या तालावर श्रोत्यांवर संगीताची बरसात करून श्रावण संध्येचा आनंद कोजागरीच्या पूर्ण चंद्राच्या साक्षीने द्विगुणित केला.

संगीतसंध्येच्या मध्यंतरात सुप्रसिद्ध ज्येष्ठ लेखक, गीतकार, पत्रकार, महाराष्ट्र राज्याचे माजी माहिती आयुक्त व विद्यमान झी- २४ तास - झी मराठी दिशाचे मुख्य संपादक सन्मा. श्री. विजय कुवळेकर यांच्या अध्यक्षतेखाली सन्मान सोहळ्याला सुरुवात झाली. त्यांच्या शुभहस्ते सुप्रसिद्ध उद्योजक - (पितांबरी उद्योगसमूहाचे सर्वेसर्वा) सन्मा. श्री. रवींद्र प्रभुदेसाई तसेच सुप्रसिद्ध संगीतकार सन्मा. श्री. कमलेश भडकमकर यांना कऱ्हाडे-भूषण पुरस्काराने व सन्मानपत्राने गौरविण्यात आले. तसेच आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या व टीसर (Tisser) संस्थेच्या संस्थापिका सन्मा. डॉ. सौ. मेघाताई विवेक फणसळकर यांना राणी लक्ष्मीबाई गौरव-भूषण पुरस्काराने व सन्मानपत्राने गौरवण्यात आले.

अतिथींनी आपापल्या खुमासदार शैलीत आठवणींना उजाळा देत आपल्या विचारांच्या दुर्वांच्या जुड्या वाहून आभार व्यक्त केले. ठाणे पोलीस आयुक्त श्री. विवेक फणसळकरसाहेबांची उपस्थिती

 * दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा! * श्री. भालचंद्र करंबेळकर, सातारा 

लक्षणीय होती. कारण त्यांच्याच साक्षीने त्यांच्या सुविद्य आणि कर्तबगार सौभाग्यवतींचा सन्मान होत होता. उपस्थित श्रोत्यांच्या आग्रहाखातर श्री. विवेक सरांना अत्यंत आदराने व प्रेमाने संबोधित करण्याची विनंती करण्यात आली. आग्रहाच्या विनंतीचा सन्मान करत त्यांनी दिलखुलास प्रतिसाद दिला. आपल्या छोटेखानी भाषणातून संघाप्रति कृतज्ञता व्यक्त करीत सर्वांचे आभार मानले.

समारंभाचे अध्यक्ष श्री. विजय कुवळेकर यांनी अनेक खुमासदार उदाहरणे देत आपल्या संबोधनात सन्मानमूर्तींच्या मेहनतीचा व यशस्वी कार्यजीवनाचा गौरव केला. आपल्या ओघवत्या वाणीने उपस्थितांची मने जिंकत हास्यकल्लोळाच्या प्रसन्न वातावरणात पौर्णिमेच्या पूर्ण चंद्रमाचे कैक कवडसे दाखवून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या उद्‌बोधक विचारांतून त्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व श्रोत्यांपुढे सहजतेने उलगडत गेले.

सोहळ्याच्या अंतिम क्षणात कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे कार्याध्यक्ष श्री. विजय आंबर्डेकर यांनी अध्यक्ष, सत्कारमूर्ती, उपस्थित सर्व मान्यवर, श्रोतृवृंद, हॉलचे व्यवस्थापक, भोजन व्यवस्थापक यांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद देऊन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी झटलेल्या पडद्यामागील असंख्य कार्यकर्त्यांचे अत्यंत समर्पक शब्दांत आभार व्यक्त केले. ज्ञातिबंधवांचा संघाप्रति असलेल्या ऋणानुबंधाचा विनम्रतेने उल्लेख करून पुढील कार्यात प्रेम आणि सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली.

मध्यंतरानंतर उर्वरित संगीत रजनीचा कार्यक्रम सुरू करण्यात आला. उपस्थितांनी सहभोजनाचा आनंद उपभोगत एक सुंदर कोजागरीची चांद्ररात मसाला दुधाचे सेवन करीत आपल्या स्मृतींच्या पुस्तकात जपून ठेवली.

आता अतिशय महत्त्वाचे असे...

संपूर्ण कार्यक्रमाचे यश श्री. विजयदादांच्या (श्री. विजय आंबर्डेकर - आम्ही सर्वच जण त्यांना विजयदादा नावाने संबोधतो आणि ते या कार्यक्रमाचे सर्वार्थाने दादाच होते.) पदरी टाकावेच लागेल, कारण त्यांनी संपर्कचातुर्याने स्थगित झालेला कार्यक्रम जसाच्या तसा घडवून आणला होता. आपल्या व्यावसायिक प्रतिभावान पण सहजसुंदर कल्पनेतून LED स्क्रीनचे आयोजन केले होते. सन्मानित अतिथींच्या कार्याचा आढावा फोटो व माहितीच्या आधारे समस्त श्रोतृवर्गाला दाखवण्यात त्यांची बरीच मेहनत होती. ढोल-ताशांच्या गजरात सत्कार घडवून आणण्याची कल्पना त्यांचीच. प्रत्येक मिनिटांचे गणित आपल्या सहजसाध्य कल्पनाविष्काराने करून संपूर्ण कार्यक्रमात आयोजनाचे रंग भरून सोहळा अविस्मरणीय केला. सौ. गीताताई काटदरे- केतकर यांच्या आकर्षक सन्मानपत्र लिखाणाची यथायोग्य दखल घेऊन कार्यक्रमाध्यक्ष मुख्य संपादक श्री. विजय कुवळेकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार केला गेला.

या संपूर्ण कार्यात त्यांना कार्यवाह - श्री. हेमंत किर्लोस्कर, सह-कार्यवाह श्री. प्रसाद पंडित, कोषाध्यक्ष - श्री. अनिल देव, सह-कोषाध्यक्ष श्री. दीपक पराडकर यांचे सहकार्य लाभले; तर सहकार्यवाह श्री. प्रसाद पंडित, श्री. विनय सांडू, श्री. पंतमिराशी यांनी महिला सदस्या सौ. अलका डोंगरे, सौ. अंजली धोपेश्वरकर, सौ. वृषाली तळेकर, सौ. अमृता किर्लोस्कर यांच्या साथीने हॉलची अंतर्गत व्यवस्था व स्वागत कक्ष सांभाळला. सौ. आदिती तांबे, सौ. अंजली पंडित, सौ. गौरी हर्डीकर, सौ. नेहा पोखरणकर यांनी स्टेजवरील अंतर्गत व्यवस्था अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने हाताळून अत्युत्कृष्ट साथ दिली, हे आवर्जून नमूद करणे आवश्यकच आहे.

क. ब्रा. संघाचे अध्यक्ष श्री. श्रीराम देव यांनी या सर्व कार्याला अनुमोदन देऊन मान्यता दिली होतीच, हेही नमूद करणं आलंच.

आपणा सर्वांचे पुनश्च आभार व धन्यवाद.

**कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई**

With best compliments from...



MUKESH V. JOSHI

INSURANCE & INVESTMENT ADVISOR

CONTACT FOR

Life Insurance
Pension Planning
Mediclaim
Fire Insurance
Mutual Fund
Fixed Deposits

ADDRESS

"Shri Neelkamal" Anandpura, Nr. Govt. Press,
Kothi Road, Vadodara-390 001
Ph.: 0265-2412812 Mobile : 098250 25006

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई या संस्थेच्या वतीने उद्योगक्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल पितांबरी प्रॉडक्ट्स प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक मा. रवींद्र प्रभुदेसाई यांना 'कऱ्हाडेभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

राजा शिवाजी विद्यालयाच्या बी. एन. वैद्य सभागृहात पार पडलेल्या 'श्रावणसंध्या सन्मान सोहळा २०१९' या कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार व राज्याचे माजी माहिती आयुक्त श्री. विजय कुवळेकर यांच्या हस्ते मा. रवींद्र प्रभुदेसाई यांना 'कऱ्हाडेभूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला.




सुप्रसिद्ध संगीतकार श्री. कमलेश भडकमकर यांनाही 'कऱ्हाडेभूषण' पुरस्काराने, तर प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या डॉ. मेघाताई फणसळकर यांना 'राणी लक्ष्मीबाई गौरव पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री. श्रीराम देव, कार्याध्यक्ष श्री. विजय अंबर्डेकर, कार्यवाह श्री. हेमंत किर्लोस्कर आदी मान्यवर तसेच कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चालला वारकरी पंढरीला

लागला पंढरीच्या विठ्ठलाचा लळा  
चालला वारकरी पंढरीला ।  
लावुनी भाळी गंधाचा टिळा  
घालुनी कंठी तुलसी माळा  
घेऊनी हाती टाळ, वीणा गळा  
चालला वारकरी पंढरीला ।।१।।

जात पंथ मनी भेद न कसला  
जमवी अनेक वारकरी साथीला  
भजने, अभंगाची साथ वारीला  
चालला वारकरी पंढरीला ।।२।।

करिती विठ्ठल नामाचा गजर वारीत  
'पुंडलिक वरदा हारी विठ्ठल' सुरांत  
दर्शनासी एकादशीस हजर हसत  
पोहोचला वारकरी पंढरीला ।।३।।

पंधरा-वीस दिसांची पायपीट  
घडविते विठू-माऊलीची भेट  
पाहुनी विठुरायाचा थाट-माट  
उपजली मनी आनंदाची लाट  
पोहोचला वारकरी पंढरीला ।।४।।

श्रीहरी गुणे  
०२०-२४५३८३५३

## मूक वेदना

कशा साहल्या मूक वेदना  
तुझ्याविना सखया रे  
कधी न कळल्या तुला मनीच्या  
निःशब्द यातना रे ।

पाझरले मम अश्रू ओठी  
नाव तुझे ते आले  
दिन-राती रे ह्या नयनांनी  
तुलाच मी पाहिले ।

जरी बंदिनी होते त्याची  
संगिनी तव जन्मांची  
तरी सांग का हृदयी तुझिया  
शंका मम शुद्धीची ?

का ना दिसली डोळा तुझिया  
खूण अपुल्या प्रितीची  
हृदयी कायम ज्योत तेवली  
जरी राघव प्रतिमेची ।

पांघरलेला होता कायम  
तव स्पर्शांचा शेला  
स्पंदनात अन् मनोमनी रे  
तूच तूच भरलेला ।

सावलीही ना कधी स्पर्शिली  
आसक्त त्या गात्रांनी  
तरी रेखिली मम सामोरी  
चिता अग्निदिव्यांनी ।

वियोगिनी मी नयनी पाणी  
राहिलास तरी निश्चल  
सांग कसे ना द्रवले पाहून  
ह्या सीतेचा छल ?

ज्ञात कधी नव्हते का तुजला  
पावित्र्य जानकीचे  
विसरलास तव प्रजेसाठी  
का कर्तव्य तू पतीचे?

ज्या साथीने चढले होते  
मंदिर मी सौख्याचे  
का ठरावे तेच रघुवरा  
कारण मम दुःखाचे ।

संचित माझे तूच घडविले  
तुझ्याच रे वचनांनी  
का मग आता दूर लोटसी  
सांग तुझ्या स्वामिनी ?

भूमिजा मी तुझी धर्मिणी  
तुजसाठी रे जगले  
सारे वाहून अंती रामा  
एकटीच मी उरले ।

-वैदेही उदय मुळ्ये, मुंबई  
मो. :८४५१८३७३६८

# आभूषणांची राणी - ऋतुजा

सौ. वीणा प्रदीप नाटेकर
मो. : ९८९२९८९०२८

१३ व्या १४ व्या शतकात संस्कृत कवी वल्लभदेव 'सुभषितावली'च्या एका श्लोकात सोळा शृंगारांसंबंधी म्हणतात-

**आदौ मज्जन चीर हार तिलकं नेत्रांजनं कुण्डले**
**नासा मौक्तिक केशपाशरचना सत्कंचुकं नूपुरौ ।**
**सौगन्ध्यं कर कंकणं चरणयो रागो रणन्मेखला ।**
**ताम्बुलं करदर्पणं चतुरता शृंगारकाः षोडषाः।**

शृंगार- मग तो दागिन्यांशिवाय होऊच शकत नाही का?

ज्वेलरी, दागिना, अलंकार- काहीही म्हणा, पण त्याच्याशी स्त्रीच नातं अगदी जवळचं आहे. बाळ जन्माला आलं की, त्याचे कान टोचतात. मुलगी असेल तर काही वर्षांनी तिचं नाक टोचलं जातं. एकूण काय- जन्मापासून अलंकार अंगावर चढायला लागतात.

खरं तर, आपल्या सणांच्या गाण्यांमध्ये दागिन्यांचा उल्लेख आढळतो. मंगळागौर, नवरात्रीतला भोंडला ह्याच्यामध्ये अनेक दागिन्यांवरून पारंपरिक गाणी आहेत. खुंटण मिरची, हटुश्य पान, सासू-सूनेचं भांडण, अरडी ग बाई परडी, राधा रुसली सुंदरी यासारख्या खेळातल्या अनेक गाण्यांत- अगदी भांगातल्या बिंदीपासून पायातल्या साखळ्यांपर्यंत सर्व दागिन्यांची नावं गुंफली जातात.

हे दागिने परांपरागत जपले जातात. घरातील कुळाचाराप्रमाणे पूजा-अर्चेच्या वशाबरोबरच दागिनेसुद्धा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे दिले जातात.

माझ्या मनात सहज विचार आला. सोन्याचा भाव गगनाला भिडतोय, पण दागिने करायची बायकांची हौस काही कमी होत नाही. अगदी श्रीमंतापासून साधारण परिस्थितीतल्या स्त्रियासुद्धा हटकून दागिना असो, सोनारांची दुकानं खच्चून भरलेली असतात.

दागिना घेताना माझ्या दागिन्याचं डिझाइन जरा हटकेच असलं पाहिजे, याकडे स्त्री वर्गाचं फार लक्ष असतं. याच ज्वेलरीचे डिप्लोमा, डिग्री कोर्स आहेत. हे क्षेत्रही युवा वर्गाला आकर्षित करून घेत आहे. या क्षेत्रातसुद्धा ७०% नोकऱ्या उपलब्ध आहेत. तरुणांनी या क्षेत्रात जरूर सहभागी व्हावे.

या क्षेत्राकडे वळलेली, घवघवीत यश संपादन केलेली ऋतुजा प्रसाद जोशी.

लहानपणापासूनच तिला चित्र-कलेची आवड होती. हात सफाईदार होता. एकदा 'सार्वजनिक गणेशोत्सव' या विषयावर शाळेत चित्र काढायला सांगितलं. ऋजुताने तबला, पेटी, झांजांच्या साथीत चाललेल्या आरतीचं चित्र काढलं. शिक्षकांनी त्या चित्राला १० पैकी ४ मार्क दिले. नाराज झालेल्या ऋजुताने ही गोष्ट आई-बाबांना सांगितली. हिच्या डोक्यात काही वेगळेच विचार आहेत, हे चाणाक्ष आई बाबांनी ओळखलं. चित्रकलेकडे पाहण्याचा ऋजुताचा दृष्टिकोन वेगळा आहे, ही गोष्ट दोघांच्याही लक्षात आली.

लहानपणापासूनच 'मला काही तरी वेगळं करायचंय' या मताशी ती ठाम होती. दहावीला चांगले मार्क मिळूनसुद्धा केळकर कॉलेजचा कला शाखेत प्रवेश घेतला.

बारावी झाल्यावर जे. जे. स्कूलला ॲडमिशन मिळत असतानासुद्धा काही तरी वेगळं करायचं, हा विचार ऋजुताला स्वस्थ बसू देत नव्हता. इतक्यात सांताक्रूझच्या एस.एन.डी.टी.मध्ये ज्वेलरीचा तीन वर्षांचा डिप्लोमा आहे, हे कळताच जे. जे. ची ॲडमिशन रद्द करून एसएनडीटीला घेतली.

बघता-बघता ऋजुतानी ज्वेलरीचं 'नॅशनल ॲवॉर्ड' पटकावलं.

डिप्लोमाच्या सुरुवातीला तिला ४० बांगड्यांची डिझाइन करायला सांगितली, ती सर्व तिच्या शिक्षकांनी नाकारली.

ऋजुताच्या चित्रकलेच्या परीक्षा झाल्या होत्या. हात सफाईदार होता. बांगड्यांची डिझाइन चांगलीच होती. पण ग्राहकाला नवीन हवं असतं. डिझाइनच्या बाबतीत स्त्रिया जास्तच चिकित्सक असतात. ऋजुताने १०० डिझाइन बनवली. याच्यातून एकच शिकायला मिळालं- तुमची सहनशीलता, कल्पकता, तसंच प्रसन्न मुखानं ग्राहकाला सामोरं गेलं पाहिजे.

या तीन वर्षांच्या काळात राजस्थानमधलं मीनाकारी काम, लाखेचे दागिने ह्याच प्रशिक्षण मिळालं. कोल्हापूरजवळ हुपरी इथे चांदीच्या मेखला, पैंजण, छल्ला, घुंगरांचे दागिने बनवणाऱ्यांची कारागिरी पाहायला मिळाली. कोल्हापूरला फक्त १५ विद्यार्थ्यांना पाठवण्यात आलं होतं. त्यात ऋजुताची निवड झाली.

व्यावसायिक क्षेत्रात ज्यांचं नाव अग्रस्थानी घेतल जात, त्या निरव मोदींकडे तिला इंटर्नशिप करायला मिळाली. ऋजुता सांगती, ''डिप्लोमाच्या शेवटच्या वर्षात पहिल्या अडीच महिन्यांत ही संधी मला मिळाली. खूप काही

शिकायला मिळालं. नेकलाईन प्रोजेक्ट हे मी मोदींकडेच केलं.''

ऋजुताच्या प्रोजेक्टचं एक पुस्तक कंपाइल होऊन भारत तसेच हाँगकाँगच्या ऑफिसमध्ये ठेवलं गेलं.

तीन वर्षांच्या अभ्यासक्रमात तिच्या कामाचं कसब ओळखून तिची डिझाइन वरुणा जानी ह्यांना खूप आवडली. वरुणाजींनी तिला रोख बक्षीस दिलंच, पण नोकरीही दिली.

डिप्लोमा पूर्ण होताच 'बी व्होक' (बॅचलर ऑफ व्होकेशनल) या डिग्रीसाठी ॲडमिशन घेतली.

डिग्रीच्या पहिल्या वर्षी कॉलेज-मधून बावीस विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी निवडलं गेलं. अर्थात त्यात ऋजुतानं 'गर्भकोश' या संकल्पनेवर डिझाइन बनवायचं ठरवलं आणि ते निवडलं गेलं.

भारतभरामधून ८०० विद्यार्थी होते. त्यातून ३५ जणांची निवड झाली. आयत्या वेळी विषय देणार होते. 'ड्रीम' या विषयावर सर्वसामान्य स्त्री घालू शकेल, असं कानातलं बनवायचं होतं. तशी त्यांची अटच होती. या ३५ जणांतून १० विद्यार्थी निवडले गेले.

ज्वेलरी इंडस्ट्रीत दिलं जाणारं 'एन. जे. ए.' (नॅशनल ज्वेलरी अॅवार्ड) अॅवॉर्ड ऋजुताला देण्यात आलं.

दहा परीक्षकांचं पॅनल या अॅवॉर्डची निवड करतं. बक्षीस समारंभाच्या वेळी दृक्श्राव्य माध्यमातून निवड चाचणी सर्वांना दाखवली जाते. ज्वेलरी क्षेत्रातली तज्ज्ञ मंडळी एकत्र येऊन त्यांच्या कौन्सिलतर्फे ऋजुताचा गौरव करण्यात आला.

एस.एन.डी.टी. आणि आय. आय. जी. या दोन संस्थांतर्फे ऋजुताला एक लाख रु. ची शिष्यवृत्ती मिळाली.

ऋजुता म्हणते, ''माझ्या यशामध्ये माझे आई-वडील तसंच एच.ओ.डी. श्री. मदन केंद्रे, प्रिन्सिपॉल सचिन लड्ढा, राहुल सर व इतर सर्व गुरुजनांचं मोलाचं मार्गदर्शन व पाठबळ मला मिळालं.''

हे जरी खरं असलं, तरी ऋजुताच्या अंगची अपार मेहनत, चिकाटी, कल्पकता, जिद्द, धडाडी, कलात्मकता या गुणांमुळेच तिला हे यश मिळालंय.

महाराष्ट्रीय पारंपरिक दागिन्यांवरचा प्रथालंकार याच्यावर तिनं प्रोजेक्ट केला आहे. मोती, हिरे, नवरत्न यांच्यावर ऋजुताचा अभ्यास सुरू आहे.

या पुढील वाटचालीसाठी, संशोधनासाठी ऋजुताला उत्तरोत्तर यश मिळो, हीच सदिच्छा!


# सप्तशती ज्वेलर्स




डोंबिवलीमध्ये सोन्या-चांदीची सुमारे ५०० दुकाने आहेत, त्यात आपल्या समाजबांधवांपैकी फक्त चारच आहोत. सप्तशती ज्वेलर्स हे त्यापैकी एक...

**कृपया आपले नातेवाईक व मित्रपरिवार यांना आपल्या दुकानाचे नाव जरूर सुचवावे. आपल्याला सोने, चांदी, रत्नाप्रित्यर्थ काही माहिती हवी असल्यास कृपया फोन करावा अथवा समक्ष भेटावे. हिरे व नवग्रहाचे खडे पारखण्याचे वैज्ञानिक प्रशिक्षण आम्ही घेतलेले असल्यामुळे रत्नांची खरेदी करताना आमच्या ज्ञानाचा आपणाला अवश्य फायदा होईल.**

**रिकरिंग डिपॉझिट (भिशी) अंतर्गत आणि मर्यादित चेन, पाटल्या, बांगड्या, वेडिंग रिंग व मंगळसूत्र यावर मजुरी आकरली जात नाही. दरमहा किमान रुपये ५०० वा अधिक रक्कम ठेवल्यास दोन वर्षांनंतर चार हप्ते जास्त दिले जातात. जुने सोने व चांदी योग्य भावात विकत घेतो.**

***व्यवसाय करणाऱ्या आपल्या समाजबांधवांना यथायोग्य सहकार्य करण्याची आपली परंपरा आहेच, त्या परंपरेचा आम्ही नम्रपणे आदर करतो.***



दुकान नं. ५०७, तळमजला, बी/३ विंग, कस्तुरी प्लाझा सोसायटी, मानपाडा पथ, डोंबिवली पू. ४२१ ०२०१.




# सुख

– अनया भाटवडेकर

''मला सांगा, सुख म्हणजे नक्की काय असतं? काय पुण्य असलं की ते... घर बसल्या मिळतं!'' आता सुखाची व्याख्याच शोधायची झाली तर, ती प्रत्येकासाठी वेगळी. एका आईसाठी तिच्या मुलांच्या चेहऱ्यावरचं निरागस हसू, तर एका बापासाठी ते त्याच्या मुलांना मोठं होणं पाहणं, तर किशोरवयीन मुलांसाठी त्याच्या मित्र-मैत्रिणींबरोबर घालवलेला वेळ असतो. आणि सर्वांत शेवटी येतात ते कोण? आजी-आजोबा. त्यांच्यासाठी सुखाची व्याख्या म्हणजे त्यांच्या आयुष्याच्या त्या काळात त्यांना त्यांच्या मुलांकडून, नातवंडांकडून मिळलेली साथ. आपण सुख इतर गोष्टींत शोधायचा प्रयत्न करत राहतो आणि ते सुख शोधण्याच्या नादात आपण स्वतः हरवतो.

खरं तर सुख हे छोट्या-छोट्या क्षणांत, गोष्टींमध्ये लपून बसलेलं असतं. ते आपण जाणवायचं असतं... एखाद्या लहान बाळाला खेळवलं की, त्याच्या



चेहऱ्यावरचे ते गोड, निरागस हसू म्हणजे सुख. आपल्या कुटुंबाबरोबर घालवलेला वेळ म्हणजे सुख. दोन शब्द आपल्या माणसांशी प्रेमाने बोलणे म्हणजे सुख. दोन क्षण आपल्या माणसांबरोबर घालवणे म्हणजे सुख. पण आजच्या काळात लोक हे सुख विसरून हे सुख यांत्रिक वस्तूंमध्ये शोधत राहतात. सतत त्या फोनवर... त्या मोबाईलमधल्या खेळामध्ये... त्या वेगवेगळ्या यंत्रांमध्ये... हे लोक सुखाची खरी व्याख्या विसरले आहेत का? ते छोट्या-छोट्या क्षणांत दडलेलं आहे. ते आता आपणच शोधायला हवं. सुख हे एका फुलपाखरासारखं असतं.... चंचल... त्याला जितकं आपण पकडायला जाऊ, ... तितकं ते लांब पळतं. पण आपण शांतपणे त्याची वाट बघितली की, ते योग्य वेळी आपल्यासमोर येतं...

## *विरोध आता कसला करता ?*

काश्मिरातही भारतमाता  
इतिहासाच्या पर्णांवरती  
आलेख चुकांचा चढेच वरती ।।

'३७०' आता रद्दची झाले  
सरकारी ही जिद्दची चाले  
ऐतोबांचे चर-कुरण संपले  
सामान्यांचे हालही सरले ।।

'३५अ' अन् बादची ठरले  
अल्पसंख्यही मुक्तचि झाले  
विघटनवादी किती बंदीत गेले  
लडाखियांचे तर जोखड तुटले  
अजून आहे मुकुट अंश तो  
जो शत्रूच्या अमली असतो  
कधी होईल जो मुक्त त्वरेने  
जन सकल परी पाहे आशेने।।

नंदनवन ते अमुचे सगळे  
सरताज हा काश्मीर झळाळे  
फिरणे बघणे सुलभची व्हावे  
पंडितवासी तुम्ही परतुनी यावे  
सफरचंद केशर बागा फुलती  
आक्रोड चिनार जोमे फलती  
संपत्तीचा जणू ओघ वळेल  
काश्मिरवासी तरी सुखी होईल  
शतकांपासुनी जी उडली दैना  
नच ती राहो हीच कामना।।

श्रीकांत सरवटे




# दिलीप श्रीधर भट - एक बहुश्रुत व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड

श्रीरंग श्री. हिर्लेकर, अमरावती
मो. : ९४२२१११८९३

अमरावतीतील भट कुटुंबीय बहुधा सर्वांना माहीत आहेत. अमरावती-बडनेरा रेल्वेमार्गाला लागून भटवाडी म्हणून एक लहान खेड्याएवढा भाग आहे. एके काळी तो यांचाच होता. डॉ. श्रीधर रंगनाथ भट व शांताबाई भट याचे लहान चिरंजीव किंवा मराठीतील प्रसिद्ध कवी कै. सुरेश भट यांचे कनिष्ठ बंधू श्री. दिलीप भट यांनी नुकतेच १३ जूनला आपल्या वयाची ८० वर्षे पूर्ण केली होती.

यांचे चिरंजीव- त्यांचे लहान भाऊ, ही अशी ओळख सांगणे हे थोडेसे अन्यायकारक आहे. कारण श्री. दिलीप भट स्वतःच एक बहुआयामी, बहुश्रुत चिकित्सक अभ्यासक, शब्दांचा आणि नियमांचा कीस काढणारे, अनेक अनुभवांनी समृद्ध, विविध माहितींचे आणि विविध विषयांचे जाणकार म्हणून मी त्यांना माझ्या लहानपणापासून ओळखतो. माझ्या आणि त्यांच्या कुटुंबाचा संबंध गेल्या ७० पेक्षा अधिक वर्षांपासून कायम आहे. माझे आजोबा प्राणाचार्य पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकर आणि डॉ. श्रीधर भट, त्यांनतर माझे वडील आयुर्वेदाचार्य पंडितराव हिर्लेकर व श्री. दिलीप भट आणि त्यानंतर त्याचे सुपुत्र श्री. रघुनंदन भट व सून सौ. छाया भट आणि मी- असे ३ पिढ्या एकमेकांशी संबंधित आहोत. श्री. दिलीप भट तसे माझ्यापेक्षा २० वर्षांनी ज्येष्ठ, पण तरी माझे आणि त्यांचे अनेक वेळा अनेक विषयांवर बोलणे होत असे. त्यांना मराठी, हिंदी, इंग्रजी, अरबी आणि उर्दू भाषा केवळ उत्तमच येत होत्या असे नव्हे, तर



त्यातील व्याकरणाचे बारकावे, सूक्ष्म अर्थच्छटा आणि अर्थभेद यावर आम्ही फोनवर अनेक मिनिटे बोलत असू. विशेष म्हणजे कुराणावरही त्यांचा अभ्यास होता.

त्यांना आणि मला कोणताही विषय बोलायला चालायचा, हे आमच्यामधील संबंधांचे रहस्य. मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, ज्योतिष, अमरावती शहरातील अनेक प्रतिष्ठित व्यक्ती आणि संस्थाचा इतिहास-अगदी आतील अज्ञात पण मनोरंजक गोष्टी, कायद्यातील पळवाटा, दूरदर्शनवरील कार्यक्रम, त्यांची चिकित्सा, यावर फोनवर बोलता-बोलता एखादा तास सहज जायचा. दर वेळेस इतका मोकळेपणा मला नसल्यामुळे कधी इनकमिंग कॉलवर त्यांचे नाव बघूनच फोन घेणे टाळावे तर ते लॅण्डलाईनवर कॉल करायचे. घरच्यांकरवी आपण घरी नाही असे सांगून टाळण्याचा प्रयत्न केला, तर ते त्यांच्याशी त्यांच्या योग्य अशा दुसऱ्या विषयावर चर्चा करून सकाळच्या कामाचा वेळ घ्यायचे. घरी कोणी आले आहे, नंतर बोलू म्हणावे, तर कोण आले विचारून त्यांच्याविषयी काही माहिती द्यायचे. तर कधी बोलताना वेळ नाही म्हणून आपण बोलणे आवरते घ्यावे तर लगेच- थांब, माझी विचाराची लिंक तोडू नकोस, म्हणून सांगायचे. तो विषय पूर्ण-देखील करायचे.

अर्थात, हे सर्व चालायचे ते जे जे केवळ आपणासी ठावे ते दुसऱ्याशी द्यावे या शिक्षकाच्या भूमिकेतून लहान १० वर्षांच्या मुलापासून ७५ पर्यंत कोणत्याही वयाची व्यक्ती त्यांना चालत असे. 'आदानं हि विसर्गाय' या रघुवंशातील राजाच्या वृत्तीप्रमाणे ते अखंड ज्ञानदानासाठी तयार असत.

अनेक विषयांवर सातत्याने वाचन आणि लेखन हा त्याचा छंद होता. हल्ली वयोमान आणि प्रकृती यामुळे ते स्वतः लेखन करू शकत नसले, तरी एखादा लेखनिक घेऊन ते माहितीपूर्ण लेख लिहून वृत्तपत्राकडे प्रसिद्धीकरता पाठवत. खरी गंमत पुढे होती. आलेल्या लेखासंबंधी फोन करून माहिती देत, त्याच्या झेरॉक्स प्रती करून घरपोच पाठवत आणि नंतर २ दिवसांत अभिप्रायाची मागणी चिकाटीने करत. इतरांचे माहीत नाही, पण निदान माझ्या तरी निर्भीड आणि स्पष्ट अभिप्रायाचे ते न चिडता स्वागत करत, तर कधी त्यांचे म्हणणे मला पटवूनही देत.

फोनबरोबरच पत्रव्यवहार हाही त्याचा छंद होता. वृत्तपत्रातील, नियतकालिकांतील लेखांचा व्यवस्थित संग्रह करणे, प्रती करणे, निरनिराळ्या लोकांना त्या पाठवणे व त्यावर चिकाटीने त्याची मते मागवून त्यावर खंडन-

मंडनात्मक चर्चा करणे- हे ते मोठ्या आवडीने करत. याही वयात ते स्वतः संगणक, इंटरनेटचा वापर करून हवी ती माहिती शोधून डाऊनलोड करून, त्या त्या विषयांच्या व्यक्तीला ई-मेल किंवा प्रिंट करून पाठवणे, चर्चा करणे ह्यात सहज रमत. आता वयाची ८० वर्षे पूर्ण करून काही किरकोळ आजार सोडले तर त्यांची प्रकृती उत्तम होती. मात्र अल्पशा आजाराने त्यांची प्राणज्योत मालवली. त्याच्या मागे सुपुत्र श्री. रघुनंदन भट, सून सौ. छाया भट, नातवंडे आणि मुलगी सौ. सुषमा जोशी (भट). जावई व माझ्यासारखे असंख्य स्वकीय आणि सुहृद आहेत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती प्रदान करो.

## आली दिवाळी

आली दिवाळी सजून धजून
लक्ष लक्ष दिव्यांची आरास घेऊन
तमाच्या गळ्यात ज्योती माळून
पहाट तेजोमयी मनात उजळून


झाली आतिषबाजी आनंदाची नयनांतून
सरी गेल्या पहा दुःखाच्या विरघळून
पसरली प्रभा अंगणी आकाशदिव्यातून
करतात स्वागत रांगोळ्या दारातून
अज्ञानावर ज्ञानाचे अत्तर शिंपडून

हसत हसत आली लक्ष्मी
बघा ती शारदेच्या मुखमंडलातून
आनंदाचे लक्ष लक्ष दीप घरोघरी असो तेवत
सुखसमृद्धीचे वैभव राहो घरोघरी नांदत

यश, प्रगतीची फुले फुलोत
सदैव आपल्या सर्वांच्या जीवनात
हीच शुभकामना साऱ्यांसाठी आमच्या मनात।

श्रीपाद टेंबे
९१५८० ८८०४२

THERE ARE IMPORTANT FINANCIAL GOALS IN LIFE




REAP"BENEFIT OF
COMPOUNDING "THROUGH SIP

NJGAP

NJ WEALTH PARTNER

CREATIVE SOLUTIONS

Milind M. Kale
Financial Advisor
www.creativesolutions.ind.in
+91 9322661502 | +91 2512437315
meetmoneyplant@gmail.com

301, Nutan Prabhat Chs, Plaot No. Rh 51, Behind Model College,
Midc Res Area, Dombivli (e) - 421 203, Maharashtra

NJ WEALTH PARTNER

CREATIVE SOLUTIONS

Milind M. Kale
Financial Advisor
Mobile: +91 9322661502 | +91 2512437315
E-mail: meetmoneyplant@gmail.com
Website: www.creativesolutions.ind.in
301, Nutan Prabhat Chs, Plaot No. Rh 51,
Behind Model College, Midc Res Area,
Dombivli (E) - 421 203, Maharashtra.

# KBBF

शब्दांकन : सौ. मेघा नाटेकर
मो. : ९६३७१५५९४८

My name is Anil Khandekar. My birth place is Rajapur, Dist. Ratnagiri. I did my schooling upto 10th in Rajapur. My academics has been very strong. I stood first in Rajapur high school.

Then I took admission in Walchand College of Engineering, Sangli for Diploma in Mechanical Engineering (D.M.E.). Our economical situation was not that strong hence I had to avail Educational loan for Diploma course as it was professional course. That was main reason for going for Diploma course! I also got National Merit scholarship to support my studies.

I completed DME with flying colors and could get admission in Government Engineering college. The biggest challenge that time was to mobilize financial support for degree course. With help of my relatives, I could complete BE mechanical Engineering. Of course, national merit scholarship was very big support to me during my education...

Immediately after Degree course in 1990, I got job in Cummins India Limited (That time it was Kirloskar Cummins Limited). Cummins gave all round training in various functions of the organization. I spent little more than two years in Cummins and then changed job.... I joined Fleetguard Filters Limited. I was always thinking that Cummins is very big organization and I was one of many people in Cummins. My future growth would have



always restrictions in big company. Fleetgaurd that time was very small company.

I joined Fleetguard as Manufacturing engineer. I got lot good opportunities to handle different responsibilities in Fleetguard. I was lucky to have guidance from Mr. Sadashiv Pandit, Managing director and Mr. Arun Kirloskar, Chairman. I got promoted to Plant manager ,then I became overall incharge of manufacturing operations of all plants etc. I was also responsible for setting up Plant in Jamshedpur. It was thrilling experience to set up total greenfield operation out of Maharshtra.

After spending nearly 10 years in Fleetguard Filters , I was given opportunity in Filtrum Tools and Components (Joint venture with Plesant Precision, USA) as managing director. At the age of 35 years , I was heading company . Filtrum was going through tough time and was making losses. We took various measures and within 1 year, filtrum started making profits. We revamped Design services Business, Started SBU (strategic Business Unit) concept. It was my first Turnaround Story ! I was in filtrum for 4 years. I was then managing business of components in Agarwal Industries.

I joined Tata Auto Components ( TACO) in 2008 as CEO of TATA Ficosa. It was Tata group's 50:50 joint venture with

one European company. Company was making huge losses. Again with various measures like right-sizing, Customer portfolio optimization etc, Tata Ficosa started making profits in nearly one and half years. It was again Turn-around story ! We also bagged many new businesses from VolksWagen, Renault Nissan etc.

After spending nearly 6 years in Tata Ficosa, I was given opportunity to lead Tata group's listed company called ASAL (Automotive stampings and Assemblies Limited). ASAL was making losses and had lost confidence of customers, employees and other stakeholders. Situation was really terrible as we were not getting businesses from Tata Motors also inspite of same group company. With lot of team work and focus on customer satisfaction, within year we could get confidence of Tata Motors, our Major Customer. We were given "Best Supplier Award of the Year" . I received it from Chairman of Tata sons that time (Mr. Cyrus Mistry). We also got confidence of employees back and were topping "Employee Engagement Score" within TACO group companies.

In three years, I joined Chassis Brakes India as Managing Director for Indian entity. It was earlier owned by Bosch and then owned by American firm. Our headquarters is in Netherlands near Amsterdam. When I joined it, it was having 670 crores turnover. It was my first experience of managing multinational company's operation in India. We could grow it to 840 crores in two years with better profitability.

**What I learnt in this journey ...**

- I always believed that in corporate you are being watched by your seniors, colleagues and also juniors. Keep doing good job and it will get noticed !
- As Marathi people many times we do not communicate our accomplishments to organization/ to all stakeholders. It is important to communicate (I do not mean overselling!) our achievements appropriately.
- When you are at leadership position, it is important to communicate. We have to communicate to customers , employees, bankers and investors regularly. We have to find out the right platforms to communicate... . It is ok to over-communicate but under-communication is not acceptable. In my career I could get good support of my team members/ best employee engagement because of appropriate communication.
- Being in manufacturing industry, we think that customer is happy if we supply right products. But how we treat our customers is very important!.. Your treatment makes your customer delighted!.... and then those customers remain with you. People remember you even if they change their jobs! They become your brand ambassador.
- For last 15 years I have been heading different organizations as C.E.O. Sometimes it is important to introspect and understand what is senior management job? ...in three words.... Direction, Facilitation, Motivation....

➢ Direction : People come to you for direction. When they go out of your cabin, it is important for them to have clear direction.

➢ Facilitation : Employees need support.... They need resources to complete task. As senior management, we must ensure that we support them.

➢ Motivation : Inspired and motivated people are efficient and effective. As senior management, our job is to keep our team always motivated.

# वैयक्तिक माहिती भरून देण्यासाठी

आडनाव नाव मधील नाव

संपूर्ण नाव (श्री/ सौ./ श्रीमती) : ----------------------------------------------------

संपूर्ण पत्ता (जवळील खुणांसहीत): ----------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

दूरध्वनी क्र. : ---------------------------- व्हॉटस् ॲप : -------------------------

ई-मेल आयडी :----------------------------------------------------------------

वर्गणी भरल्याची तारीख : ----------------------------------------------------

वर्गणी रु. : --------------------------------------------------------------

वर्गणी जमा करण्याची पद्धत : ऑनलाईन / कॅश / चेक ------------------------------------

संघाचे नाव : ----------------------------------------------------------------

संपर्क शहर प्रतिनिधीचे नाव : ----------------------------------------------------

## अभिप्राय

संपूर्ण नाव : ----------------------------------------------------------------

संपूर्ण पत्ता : ----------------------------------------------------------------

------------------------------------------ दूरध्वनी क्र. : --------------------

संघाचे नाव : ----------------------------------------------------------------

संपर्क शहर प्रतिनिधीचे नाव : ----------------------------------------------------

अभिप्राय : ------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

nakhye
UDYOG

AT YOUR SERVICE

NAKHYE'S
ASHOK
SWEETS

ALL TYPES OF MITHAI, BENGALI SWEETS, FARSAN, SNACKS, DRY FRUITS.

M/S. NAKHYE FOODS LLP. Tel - **2482106, 2483476**
• Everest Pride, Kelkar Road, Dombivli (E) Mob : **86918 99000** • Everest House, Pandit Deendayal Road, Dombivli (W) Mob : **97026 55000.**
• Everest Shopping Center, Lokmanya Tilak Chowk, Phadke Road, Dombivli (E). Tel: **2433193**. Mob : **97028 11122.**

Shubhmangal
CATERERS & AC HALL

Everest Shopping Center, Lokmanya Tilak Chowk,
Near Railway St., Dombivli (E) - 421201.
Tel: (Hall) **0251 - 2860720, 9702666000**, Fax: **2483351.**
Email: ynakhye@gmail.com
Website: **www.shubhamangalhall.com**

EVEREST
HALL

**AN AIR CONDITIONED HALL**
FOR ALL PROGRAMMES
WITH INDOOR CATERING FACILITY
AND ALL OTHER SERVICES

M. Gandhi Road, Dombivli (west).
Tel.: **9702622000, 9702011131**

EVEREST
DISTRIBUTORS

**DISTRIBUTORS FOR**
Kwality Walls (HUL), Idea Cellular, Tropicana (Pepsico),
Chitale Bandhu Mithaiwale, Mother Dairy

Everest House, Pandit Deendayal Road,
Dombivli (W) - 421202. Maharashtra, India.
Tel: **+91 251- 2483476, 2482106.**
Fax: **+91 251- 2483351.** Email: **anakhye@gmail.com**

finVantage

EQUITY: Derivatives Commodities, DP, IPO,
Mutual Fund, Realty, Life and General Insurance,
PMS and Financial Planning Advisory

M/s. Finvantage Services(P) Ltd.
2nd Floor, Everst House, M. G. Road,
Dombivili (W)-421202. Tel.: 91251 2480305

# कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

नमस्कार! कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाची २०१८-१९ ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार : दि. १५




सप्टेंबर २०१९ रोजी सकाळी ११.००ते दुपारी ४.०० या वेळेत स्वस्तिश्री सभागृह, बाजीराव रोड, पुणे येथे महासंघाचे अध्यक्ष श्री. विजय आंबर्डेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सभेला मुंबई, ठाणे, डोंबिवली, पुणे, नाशिक, नागपूर, कोल्हापूर, सातारा, सिंधुदुर्ग आणि मुलुंड संघाचे प्रतिनिधी हजर होते.

सभेच्या सुरुवातीला दिवंगत कऱ्हाडे ज्ञाती बंधू-भागिनींना २ मिनिटे स्तब्धता पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर सर्व उपस्थित सदस्यांनी आपापला परिचय करून दिला. त्यानंतर महासंघाचे कार्यवाह श्री. गणेश गुर्जर यांनी गतवर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून दाखवले व त्यानंतर महासंघाचे कोषाध्यक्ष श्री. संजय आंबर्डेकर यांनी महासंघाचा आर्थिक ताळेबंद वाचला आणि उपस्थितांना काही प्रश्न अथवा शंका असल्यास त्या विचारण्यात याव्यात, अशी सूचना करून वरील गोष्टी मंजुरीसाठी पटलावर ठेवण्यात आल्या. सदस्यांच्या शंकांचे निरसन करून तीनही प्रस्ताव पूर्ण बहुमताने संमत करण्यात आले.

वेगवेगळ्या उपस्थित संघांच्या सदस्यांनी अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात आपापल्या शंकांचे प्रश्न विचारून काही सूचना व उपसूचना सुचवल्या व त्यांची नोंद घेण्यात आली. या वर्षीचा अहवाल हा अत्यंत आकर्षक मांडणी करून सादर करण्यात आल्याबद्दल महासंघाचे कार्यवाह श्री गणेश गुर्जर यांचे सर्वच उपस्थितांनी तोंड भरून कौतुक केले.

प्राथमिक सत्र दुपारी १.०० वाजता भोजनासाठी थांबवण्यात येऊन चर्चे-दरम्यान लागलेली भूक व आलेला मानसिक थकवा दूर करण्यासाठी सर्वच सदस्य अत्यंत सुग्रास भोजनाचा एकत्रितपणे आस्वाद घेऊन दुपारच्या सत्रासाठी एकत्रित झाले. दुपारच्या सत्रात सर्वसाधारण प्रश्नांवर चर्चा झाल्या.

त्यानंतर महासंघाचे अध्यक्ष श्री. विजय आंबर्डेकर यांच्या हाती सूत्रे सोपवण्यात येऊन महासंघाच्या वाटचालीचा थोडक्यात आढावा घेऊन आजपर्यंत महासंघाच्या वाटचालीत सिंहाचा वाटा असलेले कार्यवाह श्री. गणेश गुर्जर यांना मनापासून श्रेय देऊन त्यांचे कौतुक केले आणि त्यास उपस्थितांनी उत्स्फूर्तपणे अनुमोदन दिले. महासंघाची वाटचाल ही सर्व सदस्य संघांच्या सहकार्याशिवाय पूर्णत्वास जाऊ शकत नाही, हे नमूद करून सर्व संघांचे, सभागृह व्यवस्थापन, भोजन व्यवस्थापन अशा सर्वांचे आभार मानून २०१९ च्या वार्षिक सभेची सांगता पुनश्च संध्याकाळचा नाश्ता व चहाने झाली.

सचिव, क. ब्रा.महासंघ.



Regd.Periodical RNI- No. MAHAMAR/2013/51438 (DECL.No. SDM/PUNE/SR/89/2013)

WE LOVE
WHAT WE DO.

VJ | VILAS JAVDEKAR
DEVELOPERS

www.javdekars.com

Corporate Office: 306, Siddharth Towers, Sangam Press Road,
Kothrud, Pune 411038. | T: +91-20-6764 8000

BOOK -POST(Regd. Periodical)

प्रेषक:
संपादक - कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'
कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ
द्वारा - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,
'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,
पुणे- ४११ ०३० फोन : ०२० २४४३ २४४३.

To,

KARHADE MITRA MANDAL BANGALURU
C/O Smt. VIDYA V PADHYE ,
301,RENAISSANCE REGALIA 6TH MAIN -
15TH CROSS MALLESHWARAM
BANGALURU. 560003 (9845049808)

